रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ६६
www.ramprahar.com

मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मराठवाड्यात पावसाचा कहर सुरूच; महिलेचा मृत्यू



**धाराशिव :** मराठवाड्यात पावसाचा जोर कायम असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. अशातच धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यात रविवारी रात्री उशिरा रामेश्वर व चिंचोली परिसरातील वस्तीवर पावसाचे पाणी धडकले आणि यात झोपेत असलेल्या एका महिलेला जीव गमवावा लागला. मिळालेल्या माहितीनुसार नगर-भूम रस्त्यालगत पत्र्याच्या शेडमध्ये वास्तव्यास असलेल्या देवनाबाई नवनाथ वारे (वय अंदाजे ५५) या झोपेत असतानाच अचानक आलेल्या पाण्याच्या लोंढ्यात सापडल्या. पाण्याचा प्रचंड वेग इतका होता की त्यांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू केले, मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. तहसीलदार व पोलीस प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, मुसळधार पावसामुळे शेतीचेही नुकसान झाले आहे.

अंतरंग

खोपोली स्टेशनमधील समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन/२

महाडच्या आमडोशी फाट्यावर अग्निशस्त्र, काडतुस जप्त/५

सागरी सुरक्षा चषक स्पर्धेत रोहा, मांडवा संघ विजेते/८

# सुधागडात मेंढ्यांच्या झुंजीचा जुगार

## ७५ जणांना अटक; एक कोटी ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील गोंदाव येथे टायगर गोट फार्महाऊसमध्ये मेंढ्यांच्या झुंजीवर पैसे लावून खेळला जाणारा जुगार पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणी ७५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून या कारवाईत तब्बल एक कोटी ३७ लाख ३० हजार ३०० रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, ज्यात झुंजीसाठी वापरण्यात आलेल्या मेंढ्यांचाही समावेश आहे.



रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपअधीक्षक अभिजित शिवतारे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलीस ठाण्याच्या निरीक्षक हेमलता शेरेकर, सहाय्यक निरीक्षक दीपक भोई, उपनिरीक्षक एस.एम. निकम व अन्य तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगडचे पोलीस उपनिरीक्षक लिंगाप्पा सरगर, सहाय्यक फौजदार पाटील, संदीप पाटील, हवालदार सुधीर मोरे, आरजी मोरे आदींच्या पथकाने संबंधित ठिकाणी रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास छापा टाकला.

पोलिसांनी एकूण ७५ जणांना ताब्यात घेतले असून दोन फरारी आरोपी इम्रान कुरेशी (रा. कलिना, कुर्ला, मुंबई) आणि अतिक शेख (रा. पुणे, पूर्ण नाव गाव माहीत नाही) यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मेंढ्यांच्या झुंजीकरिता जागा उपलब्ध करून दिली व त्यांना आपापसात झुंजीसाठी जबरदस्तीने व क्रूरतेने प्रवृत्त करून त्यावर पैसे लावून जुगार खेळला. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७चे कलम ४,५,१२ (ब) (क) व प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६०चे कलम ११ (१) (एम) (एन) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरारी आरोपींचा शोध सुरु आहे.

# नव्या पिढीने कर्मवीरांचा वारसा जपावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाचे कार्य अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सुरू केले. कर्मवीरांना आपल्या कार्यात अनंत अडचणी आल्या, मात्र त्यांनी प्रत्येक अडचणीवर मात केली आणि गोरगरीबांच्या दारापर्यंत शिक्षण पोहचवले. कर्मवीरांचा हा वारसा नव्या पिढीने जपला पाहिजे, असे प्रतिपादन संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.



बहुजनांच्या शिक्षणाचा आधारवड डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८वी जयंती सोमवारी (दि. २२) वाशी येथील केबीपी कॉलेज व मॉडर्न स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानचे डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचेता धामणे, तर अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर होते. त्या वेळी ते बोलत होते.

केबीपी कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष जयश्रीताई चौगुले, जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत, अविनाश लाड, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अॅड. पी.सी. पाटील, **(पान २ वर..)**

# ठाकरे सरकारमुळे मेट्रो प्रकल्प अडीच वर्ष रखडला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उद्धव ठाकरेंवर निशाणा

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाकरे सरकारमुळे मेट्रो प्रकल्प अडीच वर्ष रखडला, असा आरोप करीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. मेट्रो प्रकल्पाला विलंब झाला नसता, तर आम्ही आणखी पुढचा टप्पा गाठू शकलो असतो. मी ठाणेकर आणि मुंबईकर यांना विश्वास देऊ इच्छितो की, पुढच्या वर्षीपर्यंत यातील बहुतांश काम आम्ही पूर्ण करून तिसरा टप्पादेखील पूर्ण करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

मुंबई महानगरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला वडाळा-घाटकोपर-कासारवडवली मेट्रो ४ प्रकल्पावरील मेट्रोची चाचणी सोमवारी (दि.२२) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाण्यात झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

चाचणीवेळी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, आमदार निरंजन डावखरे, मेट्रोचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने भाजप आणि शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेट्रो प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती दिली. या प्रकल्पासाठी जवळपास १६ हजार कोटी खर्च करण्यात येत आहेत. दैनंदिन प्रवासी संख्या १३ लाख ४७ हजार अपेक्षित असून पूर्ण मार्ग सुरू झाल्यावर ही संख्या अधिक वाढण्याची चिन्हे आहेत, असे सांगून मेट्रोसाठी मोघरपाडा येथे डेपोकरिता जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.





४५ हेक्टर जागा त्या ठिकाणी उपलब्ध झाली असल्यामुळे मेट्रो ४, मेट्रो ४ अ, मेट्रो १० आणि ११ डेपो म्हणून काम होणार असल्याची माहिती दिली.

पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई आणि ठाणे असे जोडणारा मार्ग असणार आहे. मेट्रो ११ वडाळा ते सीएसएमटीपर्यंत जातो, यालाही हा मार्ग जोडला जाणार आहे. हा सगळ्यात लांब ५५ किमीचा मार्ग असून यातून २१ लाख लोक रोज प्रवास करतील. टप्प्याटप्प्याने पुढच्या वर्षीपर्यंत सर्व टप्पे पूर्ण झाले पाहिजे, असा आमचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मी ठाणेकर आणि मुंबईकर यांना विश्वास देऊ इच्छितो की, पुढच्या वर्षीपर्यंत यातले बहुतांश काम आम्ही पूर्ण करू, पण काही काम २०२७पर्यंत जाईल. एकदा हा मार्ग झाल्यावर ठाण्यापासून सीएसएमटीपर्यंत मार्गिका ही मुंबई आणि ठाणेकरांकरिता उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, जेव्हा पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते त्या वेळी इतर मेट्रोला मान्यता देत असताना ठाण्याला मात्र वगळण्यात आले होते. ठाण्याला मेट्रोच्या प्रकल्पात समाविष्ट करून घेण्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागले, आम्हाला निलंबितदेखील व्हावे लागले, असे सांगून मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या काळात हा प्रकल्प पूर्णत्वास जात आहे. मुंबई ते ठाणे ही पहिली लोकल २२ एप्रिल १८५३ रोजी धावली होती. जवळपास १७२ वर्षांनंतर मेट्रो धावत आहे, असे नमूद केले.

## कर्मवीरांना अभिवादन!





**पनवेल : शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांना आपले आदर्श मानून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय.टी. देशमुख, प्रमोद कोळी, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, 'रयत'चे पीआरओ बाळासाहेब कारंडे यांच्यासह इतर रयत सेवकांनीही कर्मवीरांना अभिवादन केले.**

## मुंब्रा बायपासवर भीषण अपघातात तीन तरुणांचा मृत्यू

**ठाणे : प्रतिनिधी**

मुंब्रा गावदेवी बायपास येथे दुचाकीवरून जाताना तीन तरुणांचा कंटेनरखाली येऊन मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २२) घडली. फजल शेख (वय २३), हसन शेख (वय १९) आणि मोईनुद्दीन शेख (वय १७) अशी या मृतांची नावे आहेत.

अॅक्टिवा गाडीने (एमएच ०४ जेपी ७८४६) हे तरुण शिळफाटाच्या दिशेने जात होते. त्यांची दुचाकी (एमएच ४६ एआर ४४४७) ही कंटेनरखाली आल्याने त्यांचा प्रवास जीवनाचा शेवटचा प्रवास ठरला. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली, तर पोलिसांनीही जाऊन पुढील कार्यवाही केली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# व्हॉट्सअॅप चॅटबॉट नागरी सुविधेचे लोकार्पण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते व्हॉट्सअॅप चॅटबॉट नागरी सुविधा या नवीन डिजिटल सेवचे लोकार्पण करण्यात आले.



या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी निलेश लांडगे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

या चॅटबॉटद्वारे नागरिकांना जिल्हाधिकारी तसेच सर्व शासकीय कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध शासकीय सेवा, योजना, कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, आवश्यक मार्गदर्शन याबाबत अधिकृत, जलद आणि तपशीलवार माहिती मिळणार आहे. यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार धाव घेण्याची गरज भासणार नाही, तर मोबाईलवरच आवश्यक माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक होणार असून डिजिटल युगातील स्मार्ट गव्हर्नन्सकडे रायगड जिल्हा एक पाऊल पुढे टाकत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी जावळे यांनी या वेळी केले.

## निवडक

### फिलिपिन्समध्येही निदर्शने; २१६ जणांना अटक

**मनीला :** नेपाळ आणि फ्रान्सनंतर आता फिलीपिन्समध्येही युवकांचा भ्रष्टाचाराविरोधातील राग उफाळून आला आहे. राजधानी मनीला येथे हजारो तरुणांनी पूरनियंत्रण प्रकल्पातील घोटाळ्याविरोधात रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. या वेळी झालेल्या हिंसाचारात तब्बल ९५ पोलीस कर्मचारी जखमी झाले. यानंतर २१६ आंदोलकांना अटक करण्यात आली असून त्यात ८९ अल्पवयीन आहेत.

### कॉकपिटमध्ये घुसण्याचा प्रयत्न; नऊ प्रवासी ताब्यात

**बंगळुरू :** एअर इंडियाच्या बंगळुरूहून वाराणसीला जाणाऱ्या विमानात एका प्रवाशाने टॉयलेटला जाण्याच्या बहाण्याने अचानक कॉकपिटचे दार उघडण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे विमानात काही काळ भितीचे वातावरण निर्माण झाले. विशेष म्हणजे त्या प्रवाशाने योग्य पासकोडही टाकला होता, पण हायजॅक होण्याच्या भितीने कॅप्टनने दार उघडले नाही. हा प्रवासी आपल्या आठ सहकाऱ्यांसोबत प्रवास करत होता. सर्व नऊ जणांना सीआयएसएफच्या ताब्यात देण्यात आले असून चौकशी सुरू आहे.

# राज्यात २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता



**मुंबई : प्रतिनिधी**

२४ सप्टेंबरला बंगालच्या उपसागरावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून २८ तारखेपर्यंत तो महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांमध्ये २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याचा अंदाज आहे.

या आठवड्यात पाऊस परत सक्रिय होणार आहे, ज्यामुळे किमान ३० सप्टेंबरपर्यंत तरी राज्यातून पाऊस निरोप घेण्याची चिन्हे दिसत नाहीत.

सध्याच्या हवामानाच्या अंदाजानुसार २२ ते २५ सप्टेंबरदरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने दुपारनंतर पडेल. कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव २६ तारखेपासून जाणवण्याची शक्यता आहे. या दिवशी विदर्भ, मराठवाड्यातील पूर्व आणि दक्षिणेकडे असलेल्या भागांमध्ये दुपारनंतर पावसात वाढ होईल. २७ तारखेला विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसात वाढ होऊ शकते. यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊसदेखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. २८ तारखेला राज्यातील पश्चिम भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या अंदाजानुसार शेतीचे नियोजन करावे. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## उदे गं अंबे उदे...



**पनवेल : आदिशक्तीच्या शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात दरवर्षीप्रमाणे यंदाही सोसायटी मित्र मंडळाने झंकार नवरात्रोत्सव आयोजित केला आहे. येथील देवीची आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते विधीवत पूजा करून आरती घेण्यात आली.**

# ‘माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करणार’


**मुंबई : प्रतिनिधी**

सामान्य प्रशासन विभागात माहिती तंत्रज्ञान हा महत्त्वाचा विभाग आहे. राज्य शासनाच्या विविध विभागाच्या सेवा या विभागामार्फत नागरिकांना पुरविल्या जातात. त्यामुळे आता माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.२२) येथे सांगितले.




मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली माहिती तंत्रज्ञान विभागाची आढावा बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते.

राज्यातील माहिती तंत्रज्ञान विभागाचे सक्षमीकरण करून डिजिटल महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा शासनाचा निर्धार आहे. शासनाच्या सर्व सेवांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि सायबर सुरक्षा यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याला प्राधान्य आहे



## रोहा अष्टमी येथे बापदेव महाराजांच्या नवरात्रोत्सवास प्रारंभ

**धाटाव : प्रतिनिधी**

अष्टमी वासियांचे श्रध्दास्थान आणि ग्रामदैवत श्री बापदेव महाराजांच्या नवरात्रोत्सवास मोठया उत्साहात सुरुवाती झाली असून बापदेव महाराज आज विधिवत देवघटी बसले, यावेळी अष्टमी ग्रामस्थ आणि भक्तांनी मंदिरात गर्दी केली होती.

यावेळी अष्टमी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष महादेव साळवी, बापदेव नवरात्रौत्सव मंडळाचे अध्यक्ष सचित साळवी, महेश मेस्त्री, हर्षद साळवी, संजय देऊळकर, प्रीतम पाचंगे, प्रसाद खुळे, प्रशांत कडू, अजित कोकाटे, विवेक कानडे, अंमलकांत मोरे, राहुल भोबड, हरेश ऐनकर, ओंकार सरपाटील, राकेश चव्हाण, जितू बामणे, रोहित हजारे, संकेत शिलधनकर आदी अष्टमी ग्रामस्थ मंडळ आणि श्री बापदेव नवरात्रौत्सव मंडळाचे पदाधिकारी व प्रमुख मान्यवर मंडळी मंदिरात उपस्थित होती.

# जीएसटीत कपात झाल्यानंतर खासदार सुनील तटकरेंकडून व्यापाऱ्यांची भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

देशाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात एक देश एक प्रणाली नंतर जी एस टी दराबाबत घेतलेल्या निर्णयाचे देशभरात सर्वत्र कौतुक होत आहे. देशभरात हा घेतलेल्या निर्णयाचा जी एस टी बचत उत्सव सुरू करण्यात आला आहे. याबाबत देशातील सर्व खासदारांना आपापल्या व्यावसायिक दुकानदारांना भेटी देऊन या बाबत जनजागृती करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर दि. २२ सप्टेंबर रोजी रायगड लोकसभेचे खासदार सुनील तटकरे यांनी निजामपूर व माणगाव बाजारपेठेत फेरफटका मारत दुकानदारांची भेट घेतली आणि नवीन जीएसटी दराबाबत माहिती दिली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस नेते बाबुशेठ खानविलकर, तहसीलदार दशरथ काळे, माजी उपसभापती तुकाराम सुतार, किरण पागार, प्रसाद गुरव, काशिनाथ देवधरे, घनश्याम तटकरे, शरद दोशी, शैलेश खांडस्कर, व्यापारी वर्ग, राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी खा. तटकरे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेशी संवाद साधत असताना जी. एस. टी. बचत उत्सव सुरू केला आहे. याचा सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. बहुतांश वस्तूंचे दर कमी झाल्याने यातून सर्वसामान्यांचं भलं होणार आहे. त्यामुळे आता व्यापाऱ्यांची भेट घेऊन सर्व ग्राहकांना याचा फायदा मिळावा यासाठी जनजागृती करत आहोत.

# खोपोली स्टेशनमधील समस्या रेल्वे प्रशासन मार्गी लावणार

## भाजपच्या आक्रमक भूमिकेनंतर आश्वासन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली रेल्वे स्थानकावर अनेक सेवा सुविधाचा अभाव असून अंतर्गत रस्ते तातडीने सिमेंट काँक्रीटचे करावे याकरिता लेखी निवेदन देऊन आठ महिने उलटले तरी रेल्वे प्रशासनाने दखल न घेतल्याने खोपोली शहर भाजपतर्फे माजी शहराध्यक्ष रमेश रेटरेकर व महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी स्टेशन मास्तर यांना धारेवर धरीत जाब विचारला कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याने रेल्वेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी सायंकाळी खोपोली गाठत रेल्वे कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक घेऊन चार दिवसा नंतर काम सुरु करण्याचे लेखी आश्वासन दिले.



गेल्या सात आठ महिन्यापासून खोपोली रेल्वे स्थानक परिसरातील अंतर्गत रस्ते पूर्ण पणे उखडून गेले असून प्रवासी व वाहन चालकाना या रस्त्यावरून प्रवास करणे अगदी जिकरीचे होऊन बसले आहे. रेल्वे प्रशासन मात्र हि दुरावस्था उघड्या डोळ्यांनी पाहत असून प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत बघत असल्याने दुपारी रेल्वे स्टेशन मास्तर यांना घेरावा घालत जाब विचारल्याने त्यांची भांबेरी उडाली अखेर रेल्वे प्रशासनाने खोपोली पोलिसांना बोलविल्याने काहीकाळ वातावरण तापले होते.

खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे यांनी मध्यस्ती केल्याने भाजप कार्यकर्त्यां बरोबर बैठक घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे तसेच रस्त्यावरील पथदीप व्यवस्था व रेल्वे स्थानकावर बहिरी मंदिर दिशेला वेंडिंग मशिन बसविण्याचे लेखी आश्वासन मावळ लोणावळा झोनचे एडीईएन सागर कदम,खोपोली स्टेशन मॅनेजर ऑगस्ट एक्का, (डीवाय )स्टेशन मॅनेजर गौरव कुमार, जीई. गोविंद रजाक यांनी या बैठकीत दिले.

यावेळी माजी शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, विस्ताक हेमंत नांदे, शहर महिला मोर्चाच्याअध्यक्षा अश्विनी अत्रे, सुप्रिया नांदे, भाई सूर्यकांत देशमुख, अजय इंगुलकर, युवा नेते विक्रम साबळे, डॉ. बबन नागरगोजे, संतोष ढोकळे, सुनिल नांदे,हिम्मत मोरे,संजय म्हात्रे, रामभाऊ पवार, सचिन मोरे, मयूर रेटरेकर, भारती शहा, गिता मोहिते, विभावरी पाठक, सिमा मोगरे, विमल गुप्ते, उपस्थित होते.

# कामोठे येथे अवयवदान अभियान उत्साहात



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

सद्गुरू वामनराव पै प्रणित जीवनविद्या मिशन स्वानंदयोग साधना केंद्र कामोठे यांच्यातर्फे रविवार, २१ सप्टेंबर रोजी युवांच्या नेतृत्वाखाली अवयवदान अभियान राबविण्यात आले. त्यावेळी कामोठे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत तायडे, डॉ. अरुण भगत, जीवनविद्या मिशनचे अनुभवी ट्रस्टी रासम साहेब, मूल्यमवार साहेब, अनिता ताई मोरे, शाखेचे पदाधिकारी करलकर साहेबतर्फे साहेब उपस्थित होते.

कामोठे परिसरात मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाचे उद्घाटन कामोठे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत तायडे यांनी केले. त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी तसेच डॉ. अरुणकुमार भगत हेही उपस्थित होते. श्री. तायडे यांनी आपल्या मनोगतातून जीवनविद्या मिशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून आपल्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. भगत यांनी आपला वैयक्तिक अनुभव सांगून या उपक्रमाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून टाकला. युवांनी आपल्या पथनाट्यातुन अवयवदानाचे महत्व व माहिती पटवून देत सर्व लोकांचे लक्ष वेधून घेतले. नंतर संपूर्ण कामोठे परिसरात अवयवदाना वरती घोषणा देत रॅली काढण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.कीर्ती हम्पे यांनी केले.

या रॅलीमद्ये कोमल लेकावळे, अमोल मोसमकर, हेमंत पटेकर, निरंजन खवळे, प्रसाद कदम, रोहित भराटे, श्रीकांत घाग, रोहीणी पाटील मीनाक्षी नांदोसकर, कुशराव आंबेकर, अरुण नाईक, भरत नागे, तसेच सर्व नामधारक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम खूप ऐश्वर्यात यशस्वीरित्या झाला.

# स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत नवी मुंबईतील धार्मिक स्थळांची साफसफाई

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशनच्या वतीने जाहीर करण्यात आल्याप्रमाणे १७ सप्टेंबरपासून स्वच्छता ही सेवा अभियानास सुरूवात करण्यात आलेली असून पंधरवडा कालावधीत दररोज आयोजित करावयाच्या विविध उपक्रमांचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार कॅलेंडर तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रत्येक दिवशी स्वच्छताविषयक विविध



उपक्रम आयोजित करण्यात येत असून त्यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मींप्रमाणेच लोकसहभागावर विशेष भर देण्यात आलेला आहे.त्या अनुषंगाने धार्मिक स्थळांच्या व त्या भोवतालच्या परिसराच्या सखोल स्वच्छता मोहीमांचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे यांच्या माध्यमातून मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे तसेच सर्व विभागांचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, उपस्वच्छता निरीक्षक यांच्या सहयोगातून सर्व विभागांमध्ये आयोजन करण्यात आले होते. बेलापूर विभागामध्ये सहा. आयुक्तअमोल पालवे व स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांच्या नियंत्रणाखाली बालाजी टेकडी येथील परिसराची माता अमृतानंदमयी मठाचे संचालक व सदस्य तसेच इतर संस्थांचे सदस्य आणि महापालिका अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी यांच्या एकत्रित सहभागातून यशस्वी रितीने साफसफाई करण्यात आली.

घणसोली विभागाचे सहा. आयुक्त उत्तम खरात व स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्या पुढाकारातून पंचशीलनगर रबाळे येथील श्रीराममंदीर व परिसरात प्रभावीपणे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# आरसीएफ शाळेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि आरसीएफ कंपनीची

**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ शाळेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि आरसीएफ कंपनीचीच असल्याचा निर्णय शिक्षण संचालकांनी दिला आहे. जो पर्यंत शाळा व्यवस्थापनाची हस्तांतरण प्रक्रीया पुर्ण होत नाही अथवा न्यायालयाचा अंतिम निर्णय येत नाही तोवर शाळेचे व्यवस्थापन डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे आणि आरसीएफ कंपनीने पूर्वीच्या कराराप्रमाणेच सुरु ठेवावे, तसे हमी पत्र तात्काळ दाखल करावे असे निर्देश शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन भत्ते व इतर बाबींवरील खर्चही डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि आरसीएफ कंपनीने पूर्वीच्या कराराप्रमाणे करावेत असे निर्देशही शिक्षण संचालकांनी दिले आहेत. शाळा व्यवस्थापनाचा हस्तांतरण प्रक्रीयेबाबत झालेल्या २५ जुलै २०२५ च्या सुनावणीनंतर शिक्षण संचालकांनी हे आदेश जारी केले आहेत. शाळेतील १ हजार १०० विद्यार्थी आणि ८० शिक्षक



आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हितास बाधा पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्याचे डेक्कन एज्युकेशन सोसायटीला सुचित करण्यात आले आहे. या शाळा हस्तांतरण करण्याबाबत निर्णय झाल्यास, डेक्कन एज्युकेशन सोसायटीने शाळा हस्तांतरणाबाबत असलेली माध्यमिक शाळा संहिता आणि १७ फेब्रुवारी २०१२ च्या शासन निर्णयातील विहीत पध्दतीनुसार कार्यवाही करावी असे निर्देशही शिक्षण संचालकांनी दिले आहेत.

पुणेच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथे आरसीएफ वसाहतीमध्ये शाळा चालवण्यात येत होती. यासाठी आरसीएफ प्रशासन आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्यात एक करार करण्यात आला होता. १९८१ ते २०११ पर्यंत हा करार अस्तित्वात होता. नंतर दर पाच वर्षांसाठी कराराचे नुतनीकरण करण्यात येत होते. त्यामुळे शाळा नियमित सुरू होती. मात्र २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून आरसीएफ सोबत कराराचे नुतनीकरण करण्यास डेक्कन एज्यूकेशन सोसायटीने नकार दिला. त्यामुळे शाळेचे भवितव्य अडचणीत आले. हे प्रकरण न्यायालयात गेले तेव्हा न्यायालयाने नविन शैक्षणिक संस्थेची नेमणूक होत नाही तोवर डेक्कन एज्यूकेशन सोसायटी शाळा सुरू ठेवण्याचे आदेश दिले. आता आरसीएफ प्रशासनाने डिएव्ही कॉलेज मॅनिजिंग कमिटी नवी दिल्ली या संस्थेची निवड केली. मात्र डेक्कन एज्युकेशन सोसायटी कडून हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण होऊ शकलेली नाही.

> **शाळेच्या व्यवस्थापनाचा घोळ लवकर मिटावा. हस्तांतरणाच्या गोंधळात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये इतकी माफक अपेक्षा पालकांची आहे.**
> **–धनंजय म्हात्रे,** पालक प्रतिनिधी

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पं. दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना अर्जास मुदतवाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षापासून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना याकरिता ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या पोर्टलवर करण्यात येत आहेत.

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश व शैक्षणिक योजनेंतर्गत अर्ज करण्याची मुदत आधी ०१ सप्टेंबर २०२५ ते १८ सप्टेंबर २०२५ अशी निश्चित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार सदर मुदतवाढ देण्यात आली आहे.

अर्ज सादर करण्याचा कालावधी १९ सप्टेंबर २०२५ ते २९ सप्टेंबर २०२५.अर्ज छाननी कालावधी ०१ नोव्हेंबर २०२५ ते ०९ नोव्हेंबर २०२५.पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार प्रवेशाची अंतिम मुदत १० नोव्हेंबर २०२५.

पान १ वरुन

## नव्या पिढीने कर्मवीरांचा वारसा जपावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

मॉडर्न स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले, केबीपी कॉलेजच्या प्राचार्य शुभदा नायक यांच्यासह विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते डॉ. राजेंद्र धामणे यांना कर्मवीर पुरस्कार, तर डॉ. सुचेता धामणे यांना लक्ष्मीबाई पाटील पुरस्कार प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये, मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

# रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज देवघटी बसले!

**धाटाव : प्रतिनिधी**

देशात ज्या दोन देवस्थानांना पोलिस मानवंदना देण्याची प्रथा, परंपरा ब्रिटीश काळापासुन सुरू आहे त्यापैकी एक असलेले रायगड वासियांचे श्रध्दास्थान आणि रोहयाचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज सोमवारी मंगलमय वातावरणात विधिवत देवघटी बसले आणि महाराजांच्या नवरात्रोत्सवास मोठया उत्सात प्रारंभ झाले.

रोहा शहराच्या पश्चिम बाजुला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी श्री धाविर महाराजांचे सुंदर आणि भव्य मंदिर आहे. मंदिरामध्ये गाभाऱ्यात श्री धाविर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा वाघबाप्पा मागे तीन वीरा यांचे स्थान आहे. मंदिराबाहेर महाराजांचा अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे. महाराजांना



विधिवत देवघटी बसविताना रोहेकरांनी मंदिरात मोठी गर्दी केलेली. हे धाविर महाराजा समस्त रोहावासिय ग्रामस्थांनी श्रध्देने आणि पारंपारीक पध्दतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे, या उत्सवामध्ये आमच्या हातुन चांगली सेवा होईल.. काही चुका सुध्दा होतील, पण महाराजा हा उत्सव गोड मानून घे तुझ्या गावाला संकटापासून दूर ठेव असे देवस्थानचे पुजारी वालेकर यांनी श्री धाविर देवस्थानचे विश्वस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते आणी शेकडो धाविरभक्तांच्या उपस्थितीत देवाकडे गारहाणे मांडले आणि अक्षतांची उधळण देवावर होत ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या उत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. गोंधळयांची आरती, विविध वाद्य आणि घंटानादाने आसंमंत दुमदुमून टाकणाऱ्यां मंगलमय वातावरणात ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली.

यावेळी मंदिरात राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, सुभाष राजे, समीर सकपाळ, विजयराव मोरे, लालताप्रसाद कुशवाह, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, आप्पा देशमुख, अमित उकडे, निलेश शिर्के, राजेश काफरे, अजित मोरे, रवींद्र चाळके, परशुराम चव्हाण, राजन पाटील, सूर्यकांत कोलाटकर, शैलेश कोळी, प्रकाश पाटणकर, वैभव साळुंखे, आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होती.

## निवडक

### सोन्याची चेन पळवली

**पनवेल :** एका ६५ वर्षीय वृद्ध व्यक्तीची फसवणूक करून सोन्याची चैन पळवून नेल्याची घटना पनवेल बस स्टॅन्ड परिसरात घडली आहे. चंद्रशेखर सावंत यांनी कळंबोली येथे जाऊन परत पनवेल बस स्टॅन्डला यायचे असल्याचे सांगून भाड्याचे पैसे देतो असे सांगून एक इको गाडी ठरवण्यात आली होती. त्या चालकाने सावंत यांना त्यांच्या न कळत त्यांना गुंगीकारक औषध चहा पिण्यास देऊन त्यांच्या गळ्यातील जवळपास २,५०,००० रुपये किमतीची सोनसाखळी चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### स्कुटी गाडीची चोरी

**पनवेल :** शहरातील ठाणा नाका ते कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी कडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवलेली स्कूटी गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. नवीन रावजी यांनी त्यांची १० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची स्कुटी गाडी (एमएच ०३ बीयू ५३६२) ही शहरातील ठाणा नाका ते कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवले असता अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### होस्टेलच्या ग्रंथालयात चोरी

**पनवेल :** शहरातील महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या होस्टेल ग्रंथालयातील कपाटामधून अज्ञात चोरट्यांनी चोरी करून जवळपास १,०७,००० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरटयांनी चोरी करून तेथील प्रोजेक्टर, स्पीकर, माईक सेट, कॉम्पुटर, मॅगझीन स्टॅन्ड असा मिळून जवळपास १,०७,००० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अज्ञाताचा मृतदेह आढळला

**पनवेल :** शहरातील प्लॉट नंबर ७६, झुंजार सोसायटीच्या गेटच्या बाजूला एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्ष, रंग सावळा, उंची ५ फूट, चेहरा उभट, अंगाने मजबूत, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशीचे केस पांढरे वाढलेले, डाव्या हाताच्या कोपरा जवळ जुनाट जखमा असून अंगात काळसर फुल पॅन्ट व निळी हाफ बाह्याचा टीशर्ट, पायात निळे शूज आहे. या बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणमहर्षी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८वी जयंतीनिमित्त पालखी सोहळा झाला.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी.साळुंखे स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, विश्वास तांडेल, वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य अमोद ठक्कर, उपमुख्याध्यापिका एस. डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस.एस. पाटील, लेखनिक नवनीत ठाकूर व उपस्थित प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व त्यागमूर्ती लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अन्विता पाटील हिने सुमधुर आवाजात रयते मधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे या गीताचे सादरीकरण केले. या वेळी आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते प्रा. एच.एम. धुरी व एच.एन.पाटील यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यानंतर विद्यालयाचे गुरुकुल विभाग प्रमुख ए.आर.म्हात्रे व उपशिक्षिका एस.व्ही.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीम पथकातील मुलींनी सुंदर लेझीमचे सादरीकरण केले. पालखी घुरबादेवी मंदिराकडे विविध घोषणा व रयत गीत, रयत माउली गीत गात नेण्यात आली व नंतर विद्यालयात पालखी आणली. त्यानंतर इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा आवेदन पत्र भरण्याचा शुभारंभ झाला.

या वेळी चेअरमन कृष्णाजी कडू, अमोद ठक्कर, बी.बी.साळुंखे, आर. जी.शेळके यांनी शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे पोषण आहार विभाग प्रमुख एस.डी.नाईक व पी.ए.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गोड जेवण देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी घेण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन.पाटील यांनी केले.




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८व्या जयंतीनिमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत कनिष्ठ महाविद्यालयात 'कर्मवीर पालखी' मिरवणूक सोहळा अतिशय उत्साहात व जल्लोषात झाला.

या वेळी स्थानिक स्थाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जयवंतराव देशमुख यांनी श्रीफळ वाढविले. सर्व मान्यवरांनी पालखी मार्गस्थ केली.

क्रीडा शिक्षक सुरेश पारखे व ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थ्यांच्या पारंपारिक लेझीम आणि झांज पथकामुळे जोशपूर्ण वातावरण निर्मिती झाली.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, गुरूकुल प्रमुख संदिप भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आदी उपस्थित होते.

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये सोमवारी (दि.२२) रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३८ वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात झाला.




या सोहळ्यासाठी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन केले गेले, तसेच विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या थोर महापुरुषांच्या पुतळ्यांचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केले गेले. विद्यालयाच्या प्राचार्या के.जी.म्हात्रे, उपमुख्याध्यापक व्ही. के. कुटे, पर्यवेक्षिका के.एस. मुकादम यांच्या हस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन केले गेले.

फुलांनी सजविलेल्या पालखीत कर्मवीरांची प्रतिमा ठेवून, विद्यालयाच्या लेझीम, बँड पथकांच्या गजरात पालखीची मिरवणूक सर्व शिक्षक, विद्यार्थी यांच्या समवेत संपूर्ण जासई गावातून फिरली. या वेळी पालक व ग्रामस्थ यांनी कर्मवीरांच्या पालखीचे दर्शन घेतले तसेच सुवासिनींनी कर्मवीरांच्या पालखीला ओवाळनी केली. कर्मवीरांच्या जयघोषात पालखी शाळेच्या मैदानावर माघारी आली.

या कर्मवीर जयंतीच्या निमित्ताने या कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, व्हाईस चेअरमन डी.आर.ठाकूर, अमृत ठाकूर, गणेश पाटील, नामदेव पाटील एकनाथ पाटील, गोपीनाथ म्हात्रे, महादेव पाटील, गोपीनाथ ठाकूर, धावजी पाटील, डी. बी. म्हात्रे सर, यशवंत घरत, धर्मदास घरत, सुभाष घरत, महादेव म्हात्रे, शकुंतलाताई घरत, उपसरपंच सृष्टी म्हात्रे, विना घरत, सुलोचना घरत, मनीषा घरत, जयश्री घरत, उषाताई म्हात्रे, इत्यादी मान्यवर सर्व विद्यार्थी व सेवक वर्ग उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात चित्रकला स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालय येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.२०) करण्यात आले होते.



या स्पर्धेला प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, मुख्याध्यापक सुभाष मानकर यांची उपस्थिती लाभली. चित्रकला स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून मराठी माध्यमिक विभागाच्या कलाशिक्षिका वीणा देवरुखकर मॅडम यांनी काम पाहिले. चित्रकला स्पर्धेसाठी संस्थेच्या सहा शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

गट एक इयत्ता- पहिली / दुसरी : प्रथम क्रमांक- चि.तक्ष निलेश सावंत (चांगू काना ठाकूर इंग्रजी प्राथमिक विद्यालय. नवीन पनवेल.) द्वितीय क्रमांक अन्वी संजय पाटील (चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल.), तृतीय क्रमांक सिया गणेश पालवणकर (चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल.)

गट २- इयत्ता- तिसरी/ चौथी : प्रथम क्रमांक हिर अरविंद मखवाना (मोरु नारायण म्हात्रे विद्यालय गव्हाण कोपर, द्वितीय क्रमांक दुर्वा योगेश पाटील (चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल.), तृतीय क्रमांक अरुणा सचिन क्षीरसागर (चांगू काना ठाकूर इंग्रजी प्राथमिक विद्यालय, नवीन पनवेल.)

शेवटी सहाय्यक शिक्षक- पंढरीनाथ जाधव यांनी मान्यवरांचे शब्दसुमनाने आभार मानले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कर्मवीर जयंती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.२२) ग्रंथालय समितीच्या वतीने सामाजिक क्रांतीचे प्रणेते व शिक्षण तत्त्वज्ञ पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमामध्ये प्रा. महेश धायगुडे आणि प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावर व त्यांनी कष्टमजूर व शेतकरी वर्गातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची माहिती दिली तसेच रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून झालेल्या शिक्षण प्रसाराचे महत्त्व सांगितले. त्यांनी कर्मवीरांचा आदर्श आजच्या शिक्षकांनी स्वीकारावा, असे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर समन्वयक ग्रंथालय समिती यांनी केले तसेच समितीतील इतर सदस्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. समारोप करताना ग्रंथालय समितीने सर्व शिक्षकांचे आभार मानले आणि अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या जयंतीनिमित्त असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असे सांगितले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते देवीची प्राणप्रतिष्ठापना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ खारकोपर, भारतीय जनता पक्ष उलवे नोड आणि खारकोपर महिला मंडळ यांच्या वतीने नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या उत्सवाचे २१वे वर्ष आहे. माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते खारकोपर येथील जय बजरंग कला, क्रीडा मैदानात देवीची प्राणप्रतिष्ठापना आणि पूजा करण्यात आली.

या वेळी माजी उपसरपंच विजय घरत, वामनशेठ म्हात्रे, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, साईचरण म्हात्रे, दयानंद घरत, संदिप म्हात्रे, अनंत ठाकूर, वसंतशेठ पाटील, अनिल देशमुख, नामदेव ठाकूर, दामोदर भोईर, गणेश भोईर, रामदास घरत, पांडुरंग पाटील, सुदर्शन घरत, कैलाश घरत, भगवान घरत, वैभव घरत, विघ्नेश घरत, नंदा भोईर, काशिनाथ पाटील, नर्मदा घरत, भाऊ भोईर, अनुताई घरत, इंदुताई म्हात्रे, कान्ता पाटील, निशा घरत, रुपाली पाटील, शुभांगी घरत, अंकिता भोईर, सोनाली घरत, विक्रांत घरत, अर्पणा पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या नवरात्र उत्सवात २ ऑक्टोबरपर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. तसेच, दररोज रात्री १० वाजता पैठणी साडी आणि आकर्षक बक्षिसे देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.



**पनवेल : अभिनव सामाजिक विकास मंडळ गुळसुंदे यांच्या वतीने यंदाही नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील समाजमंदिरात सोमवारी विधीवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर देवीची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली. यंदा मंडळाच्या नवरात्रोत्सवाचे १६वे वर्ष आहे.**

### महात्मा फुले महाविद्यालयात उद्या कर्मवीर जयंती सोहळा

**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेच्या पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शिक्षणमहर्षी व संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८वी जयंती सोहळा बुधवारी (दि.२४) दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मैनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे असून प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव (उच्च शिक्षण) डॉ. डी. डी. पाटील हे उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा भाजप नेते जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, महेंद्र घरत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी दिली.



## संपादकीय

# संकटाचे संधीत रूपांतर?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसासाठी अर्जाची रक्कम ८८ लाखांपर्यंत वाढवण्याच्या आदेशावर नुकतीच स्वाक्षरी केली. अलीकडील आकडेवारीनुसार ७१ टक्के एच-१बी व्हिसा भारतीयांना मिळाला होता. त्यामुळेच अमेरिकेच्या अफाट वाढीव शुल्काच्या निर्णयामुळे भारतीय टेक वर्कर्स आणि कंपन्यांना फटका बसू शकतो अशी भीती व्यक्त होत असून या संकटाचे संधीत रूपांतर करण्यावर भारताने लक्ष केंद्रित करायला हवे असा सूरही लावला जातो आहे.

**अमेरिकेतील उच्च तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये परदेशी प्रतिभावान कामगारांची भरती करण्यासाठी आवश्यक 'एच-१बी व्हिसाच्या शुल्कामध्ये प्रचंड वाढ करून ते वार्षिक एक लाख डॉलर म्हणजेच साधारण ८८ लाख रुपये इतके करण्याचा निर्णय राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला. नवीन स्थलांतर धोरणाचा भाग म्हणून ट्रम्प यांनी वाढीव शुल्काचे हे पाऊल उचलले आहे. एकीकडे आयातशुल्काद्वारे भारताला धक्का दिलेला असतानाच ट्रम्प यांनी आता एच-१बी व्हिसाचे हे नवे शस्त्रही उगारले आहे. हे व्हिसा प्रामुख्याने विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रातील कौशल्यधारी कामगारांसाठी दिले जातात. परंतु एच-१बी व्हिसाच्या गैरवापरामुळे अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाला असून सामान्य कुवतीच्या परदेशी कामगारांनाही तो मिळत असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचारापासूनच ट्रम्प यांनी सातत्याने अशी भूमिका घेतली होती की परदेशी नागरिक अमेरिकन लोकांच्या नोकऱ्या हिरावून घेत आहेत. एच-१बी व्हिसासंबंधी ताज्या बदलांमुळे आता परदेशातून फक्त आवश्यक उच्च कुशल कामगारच अमेरिकेत आणले जातील असे मत ट्रम्प प्रशासनातील मंडळींकडून व्यक्त केले जाते आहे. १९९० मध्ये सुरू करण्यात आलेल्या एच-१बी व्हिसांची संख्या २००४ पर्यंत वाढवून ८४ हजार करण्यात आली. हा व्हिसा लॉटरी पद्धतीने व प्रामुख्याने अत्यंत कुशल कामगारांना दिला जातो. सध्या हे शुल्क वार्षिक २ ते ५ हजार डॉलर म्हणजे १ लाख ७६ हजार रुपये ते ४ लाख ४० हजार रुपये इतके आहे. अलीकडील आकडेवारीनुसार ७१ टक्के एच-१बी व्हिसा भारतीयांना आणि १२ टक्के व्हिसा चिनी नागरिकांना दिले गेले आहेत. अमेरिकी वेळेनुसार २१ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपासून लागू होणाऱ्या या निर्णयाचा अमेरिकेतील स्थानिकांना किती फायदा होईल हे येणारा काळच दाखवून देईल. मात्र गेल्या आर्थिक वर्षात सर्वाधिक व्हिसांचा फायदा मेझॉन, पल, मेटा आणि गुगल या अमेरिकी कंपन्यांनाच झाला होता. कामाच्या गरजेनुसार कंपन्या एच-१बी व्हिसाची मागणी करतात व शुल्कही त्याच भरतात. अफाट शुल्कवाढीमुळे या कंपन्या नव्याने परदेशी कर्मचारी घेण्यास धजावणार नाहीत व त्याचा फटका भारतीयांना बसू शकेल. भारतातील सॉफ्टवेअर उद्योगाची शिखर संस्था नासकॉमनेही हीच भीती व्यक्त केली आहे. पूर्वी एच-१बी अंतर्गत दरवर्षी परदेशी कामगार ६० हजार डॉलर (५२ लाख रूपये) किमान पगारावर अमेरिकेत येत, तेव्हा स्थानिक कर्मचाऱ्यांचा सरासरी पगार १ लाख डॉलर (८८ लाख रूपये) होता. अमेरिकेच्या वाढीव व्हिसा शुल्काच्या निर्णयामुळे जगभरातील सर्वोत्तम प्रतिभा आकर्षित करण्यात अमेरिकेला अडचणी येतील व त्यामुळे अमेरिकेचीच संशोधनावरील पकड सैल होईल असा इशाराही दिला जातो आहे. भारतीय कुशल तंत्रज्ञ अमेरिकेखेरीज अन्य देशांत जातील किंवा त्यांना देशातच पोषक वातावरण लाभल्यास आपल्याला या संकटाचे संधीत रूपांतरही करता येऊ शकेल.**

# पनवेलचे आराध्य ग्रामदैवत जाखमाता देवी

सन १९४२ ते ४७च्या कालावधीत पनवेल गावात प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. यावेळी प्लेगच्या साथीला घाबरुन अनेकांनी पनवेल गाव सोडुन अन्यत्र जाण्याचा निर्णय घेतला, परंतू पनवेलच्या जाखमाता देवीवर ज्यांची अपार श्रध्दा होती असे भक्त देवीच्या मंदीर परीसरात देवीच्या कृपाछत्राखाली अधिवास करुन राहीले .त्यांच्यावर प्लेगच्या साथीचा कोणताही परीणाम झाला नाही. हया दृष्टांतापासुन जाखमाता देवीचे महात्म्य पनवेलच्या आजुबाजुच्या गावातुन पोहचले.

तेव्हा पासुन पनवेलचे जागृत देवस्थान व पनवेलकरांचे दुष्टांपासुन रक्षण करणारी जाखमाता देवी ही भक्तांची माता म्हणुन हृदयस्थानी अढळ झाली. या देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सव मोठया भक्तीभावाने व जल्लोषात गेल्या अनेक वर्षापासुन साजरा केला जात आहे सहभागी पनवेलची जागृत माता अन पनवेलकरांचे संकटापासुन रक्षण करणारया देवीचे मुळ नाव हे जाखमाता असल्याची नोंद ईतिहासात सापडते. नवसाला पावणारी व रोगराई पासुन भक्तांचे रक्षण करणारी जाखमाता देवी असल्याची अपार श्रध्दा पनवेलवासीयांची आहे. या देवीचे पुजारी भोपी व जाखमाता मंदीराचे व्यवस्थापक देवीची पुजाअर्चा व देवीच्या मंदीराची सर्व व्यवस्था पाहतात. त्यांचेकडुन देवीबाबत भक्तांची असणारी श्रध्दा त्यांनी विशद केली. प्लेगच्या साथीपासुन पनवेलकरांचे देवीचे रक्षण केल्याने देवी जागृत असल्याची श्रध्दा पनवेलवासीयांची झाल्याने त्यांनी देवीची पालखीतुन मिरवणुक काढली .त्या दिवसापासुन देवीची दरवर्षी चैत्र महीन्यात पालखीचा सोहळा केला जातो. या सोहळयात पनवेल सह आजुबाजुच्या गावातील देवीचे भक्त सहभागी होतात. सदरचा पालखी सोहळा हा रात्री ९ वाजल्यापासुन सुरू केला जातो .तो संपुर्ण पनवेलमधुन फिरुन पहाटेपर्यत देवळात आणण्याची प्रथा गेल्या नऊ ते दहा दशकापासुन सुरू आहे.यावेळी देहभान विसरुन भाविक पालखीच्या मिरवणुकीत भजन आरत्या व देवीचा जयजयकार करीत असतात.परंतू २१ व्या शतकात कायदयाचे बंधन या पालखी सोहळयाला लागल्याने पालखी वेळेच्या बंधनात फिरवली जात आहे.



नवरात्र उस्तवात नवस फेडण्यासाठी पनवेलच्या पंचक्रोशीतील भाविकांची मोठया संख्येने गर्दी होत असते. देवीला साडीचोळी नेसवीणारे व ओटी भरणारे भाविक मोठया प्रमाणावर असल्याचे मंदीराचे पुजारी भोपी सांगतात. देवीच्या नवसात विविधता आढळुन येत आहे.यामध्ये काही भक्त देवीला पाळण्याचा नवस बोलतात तर काही भक्त जन्मलेल्या मुलाचे व्यंग बरे होण्यासाठी साकडे घालुन आपल्या आर्थीक कुवतीनुसार चांदी, तांबे किंवा लाकडी अवयवयांच्या प्रतिकृती देविला अर्पण करुन आपले नवस फेडतात. गावात जन्माला आलेले बाळ प्रथम देवीच्या पायावर ठेवल्याशिवाय गावाबाहेर न्यायचे नाही असा प्रथा अजुनही पनवेल गावात परंपरेने चालत आलेला पाहावयास मिळतो. नवविवाहीत दापंत्यही प्रथम देवीच्या दर्शनासाठी येण्याचा प्रथा आहे. या देवीचे चैत्र महीन्यात निघणारी पालखी सोहळा व आश्विन महीन्यातील नवरात्रोत्सव हे दोन उस्तव दरवर्षी मोठया श्रध्देने व जल्लोषात साजरे केले जात आहेत. तसेच दर मंगळवारी व शुक्रवारी देवीची सामुदायीक आरती केली जात असते. जाखमाता देवीच्या जुन्या आख्यायिका लक्ष्मीबाई लक्ष्मण भोपी हयांच्याकडुन त्यांनी आपल्या भोपी परिवार यांना सांगुन ठेवल्या आहेत. त्यामध्ये देवीचे वाहन हे वाघ होते व देवी वाघावर बसुन तेव्हाचे पानवेल म्हणजे आजच्या पनवेल गावातुन फेरफटका मारुन गावाचे रक्षण करीत असे. देवीचा वाघ देवीच्या मंदीरात नित्यनेमाने येत असे. एकदा देवीचा वाघाला देवळात जाण्यास विलंब झाल्याने तो गोंधळुन गेला अन पनवेल मधिल नानासाहेब पुराणिकांच्या घरात शिरला .वाघाला पाहुन लोक घाबरले त्यावेळी जुन्या प्रांत कार्यालयासमोर राहणारया टी.पी.श्रृंगारपुरे यांनी त्यांच्याकडील बंदुकीने गोळया घालुन ठार मारल्याचे सांगीतले जाते. या देवीच्या पुरातन मंदीराचा जिर्णोध्दार केला गेला आहे. नवरात्री उस्तवात हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी एकच गर्दी करीत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. पनवेल सह नव्या मुंबईतील हजारो भक्त गण या नवरात्र उत्सवात आपले नवस फेडण्यासाठी व आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यानंतर देवी चे दर्शन घेऊन ओटी भरण्यासाठी एकच गर्दी करीत असल्याचे दिसून येते.

**-दीपक घोसाळकर**

# नवरात्रीचे नऊ रंग आणि त्यांचे महत्त्व

शारदीय नवरात्री हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हा सण साजरा केला जातो. हा नऊ दिवसांचा उत्सव दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. या काळात देवीच्या प्रत्येक रूपाची पूजा केली जाते.

हिंदू धर्मात नवरात्री अर्थात घटस्थापने दरम्यान संपूर्ण देशभरात देवीची पूजा केली जाते. नवरात्री दरम्यान नऊ दिवस उपवास व देवीची पूजा अर्चना करतात.या प्रत्येक दिवसासाठी एक विशिष्ट रंग ठरलेला असतो. हे रंग केवळ परंपरेचा भाग नसून, त्यांचे आध्यात्मिक महत्त्व ही आहे. यातील प्रत्येक रंग देवीच्या विशिष्ट गुणांचे आणि शक्तीचे प्रतीक मानले जातो. या नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे परिधान केल्याने देवीचा विशेष आशीर्वाद मिळतो, असे म्हटले जाते.

नवरात्र म्हटलं की गरबा, दांडिया यासोबतच नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे घालण्याची एक वेगळी गंमत असते. येत्या २२ सप्टेंबरपासून शारदीय नवरात्रोत्सव सुरु होणार आहे. नवरात्रीतील नऊ रंगांचे महत्त्व देवीच्या विविध रूपांचे प्रतीक आहे, तसेच ते सणाचा आनंद, सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिकतेचे प्रतिनिधित्व करतात. हे रंग दरवर्षी कॅलेंडरनुसार बदलतात आणि प्रत्येक दिवसाच्या विशिष्ट देवी रूपाशी जोडलेले असतात.



सामान्यतः, पांढरा रंग शांतता, लाल रंग उत्साह, पिवळा रंग आनंद, हिरवा रंग समृद्धी, रॉयल निळा रंग देवत्व, राखाडी रंग नम्रता, नारंगी रंग चैतन्य, जांभळा रंग उत्साह आणि मोरपंखी हिरवा रंग एकता दर्शवतो.

रंगांचे महत्त्व आणि प्रतीकात्मकता-पांढरा: हा रंग शुद्धता, शांती आणि नवीन सुरुवात दर्शवतो. लाल: लाल रंग ऊर्जा, उत्साह आणि पराक्रमाचे प्रतीक आहे, जो दुर्गामातेच्या पराक्रमी रूपाला प्रिय आहे. रॉयल निळा: हा रंग देवत्व आणि शांततेचे प्रतीक आहे. पिवळा: पिवळा रंग आनंद, प्रकाश आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतिनिधित्व करतो. हिरवा: हिरवा रंग समृद्धी, नवीन जीवन आणि वाढ दर्शवतो. राखाडी (ग्रे): हा रंग नम्रता आणि संतुलित वृत्तीचे प्रतीक आहे. नारंगी (ऑरेंज): नारंगी रंग चैतन्य, ऊर्जा आणि उत्साहाचे प्रतिनिधित्व करतो. जांभळा (पिंगट/पर्पल): हा रंग उत्साह आणि भक्ती दर्शवतो. मोरपंखी हिरवा (पीकॉक ग्रीन): हा रंग एकता, प्रेम आणि विश्वाचे प्रतिनिधित्व करतो.

रंग कसे बदलतात-नवरात्रीचा काळ चंद्राच्या कॅलेंडरवर आधारित असतो, त्यामुळे प्रत्येक वर्षी सुरुवातीची तारीख बदलते. या तारखेनुसार रंगांचा क्रम निश्चित केला जातो. त्यामुळे, दरवर्षी रंग बदलतात आणि प्रत्येक रंगाचे महत्त्व विशिष्ट दिवसाच्या देवीच्या रूपाशी जोडलेले असते.

नऊ रंगांचे कपडे परिधान केल्याने सकारात्मक ऊर्जा मिळते आणि नकारात्मकतेचा नाश होतो. आपल्या परिधानातून एकता दर्शवण्यासाठी अशाप्रकारे नऊ रंगांचे कपडे घातले जातात. हे रंग देवीच्या विविध रूपांशी आणि गुणांशी संबंधित आहेत, ज्यामुळे तिची कृपा प्राप्त होते. हे रंग सणाला एक विशेष उत्साह आणि आनंदी वातावरण देतात.

**-श्रीराम महाजन, चेंबूर, मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# ईएमआय भरू शकला नाही, तर फोन होईल लॉक

तुम्ही जर नुकताच लाँच झालेला आयफोन १७ किंवा इतर कुठला महागडा स्मार्टफोन ईएमआयवर घेण्याचा विचार करत असाल, तर थोडं थांबा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया फेअर प्रॅक्टिसेस कोडमध्ये सुधारणा करण्याचा विचार करत आहे. जर नवीन नियम मंजूर झाले तर ग्राहकांसाठी ईएमआयवर स्मार्टफोन खरेदी करणं काहीसं अवघड होऊन जाईल. या नवीन नियमांनुसार, जर ग्राहक मासिक ईएमआय भरू शकला नाही तर त्याचा फोन लॉक केला जाऊ शकतो.





आरबीआयने हे नियम लागू केले तर त्याचा स्मार्टफोन बाजारपेठेत तसंच वित्त क्षेत्रात मोठा परिणाम होऊ शकतो. आरबीआय अशा धोरणांवर विचार करत आहे, ज्याअंतर्गत कर्ज देणाऱ्यांना ग्राहकाचा ईएमआय चुकल्यास त्याचा फोन कुठल्याही ठिकाणाहून लॉक करण्याचा अधिकार असेल. भारतातील वाढत्या बुडीत कर्जाच्या समस्येवर प्रकाश टाकताना इलेक्ट्रॉनिक्स कर्जांशी संबंधित हा नवीन नियम लागू केला जाऊ शकतो.

येत्या काही महिन्यांत फेअर प्रॅक्टिसेस कोडचा भाग म्हणून या पद्धतीचे नियमन करण्यासाठी आरबीआय सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, हे नवीन नियम कर्ज देणारे आणि कर्जदार दोघांसाठीही कठोर अटी असलेले असतील.

कर्ज देणाऱ्यांनी कर्जदाराकडून स्पष्ट आणि पूर्व संमती घेणे आवश्यक आहे कर्ज देणाऱ्यांनी हे निश्चित करावे की ग्राहकांना करारावर स्वाक्षरी करताना डिफॉल्टच्या संभाव्य परिणामांची स्पष्ट जाणीव असावी.महत्त्वाचं म्हणजे कर्ज देणाऱ्यांनी एखाद्या ग्राहकाचा फोन लॉक केला तरीही त्या फोनमधील कोणत्याही वैयक्तिक डेटाचा वापर करणं प्रतिबंधित असेल. त्यामुळे या संदर्भातील गोपनीयतेच्या समस्या दूर होतात.आरबीआयने अशी कठोर पावलं उचलण्यामागे एक प्रमुख कारण म्हणजे ग्राहक वित्तपुरवठ्याच होणारी जलद वाढ. सध्या नॉन-बँकिंग कर्जदाते मोठ्या ब्रँडच्या फोनसाठी ८५ टक्के इतके कर्ज देतात. असं असताना मोठ्या प्रमाणात कर्जाची थकबाकीदेखील मोठी समस्या आहे. वित्त क्षेत्राला आशा आहे की, यामुळे ग्राहकांना वेळेवर पेमेंट करणे बंधनकारक असेल .

# स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहेरअली

युसूफ मेहरअली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. मेहरअली फार कमी वयात भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले. तरुण वयात ते ब्रिटिश सरकारच्या गुलामगिरी विरोधात रस्त्यावर उतरले. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. 'चले जाव' ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती. आज युसूफ मेहरअली यांचा जन्मदिन (२३ सप्टेंबर १९०३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

यूसुफ मेहरअली हे भारतातील युवक चळवळीचे नेते, उत्तम वक्ते व स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक. त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला, पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के.एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून (मुंबई विद्यापीठ) त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एएलएलबी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी आ. रा. भटांच्या मदतीने बॉम्बे यूथलीगची स्थापना केली (१९२८). पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा नावाची सैनिकीसम संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. या सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी चर्चासत्रे, बौद्धिके आयोजित केली आणि व्याख्याने दिली.

कलकत्त्याच्या अखिल भारतीय युवक काँग्रेसचे ते महासचिव झाले. बार्डोलीचा साराबंदी सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आदींतून त्यांनी सक्रिय भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीनंतर त्यांनी स्वदेशी वस्तूंचा सर्वत्र प्रसार केला आणि मुंबईत स्वदेशी वस्तू विकल्या. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै, १९५० रोजी वयाच्या ४७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेरअली सेंटर चालवले जाते.

स्वातंत्र्य चळवळीत गुंतलेले असूनही, त्यांनी तरुणांसाठी विचारप्रवर्तक लेखन केले. वृत्तपत्रांतील स्फुटलेखनाशिवाय त्यांनी लीडर्स ऑफ इंडिया (दोन खंड-१९४२), ए ट्रिप टू पाकिस्तान (१९४३), द मॉडर्न वर्ल्ड (१९४५), द प्राइस ऑफ लिबर्टी (१९४८) इ. पुस्तके लिहिली. ते आजन्म अविवाहित राहिले. आणि सर्व जीवन त्यांनी देशासाठी वाहिले. ते नास्तिक होते. अनेक पारशी व हिंदू त्यांचे सच्चे मित्र होते. मुंबईच्या कामगार चळवळीतील व भारतीय युवक संघटनेतील त्यांचा वाटा संस्मरणीय आहे. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# आयुर्वेदात लवंग खाण्याचे अनेक फायदे

आयुर्वेदात भारतीय मसाल्याने मोठं महत्त्व आहे. भारतीय मसाल्याने जगभरात मागणी आहे. अनेक मसाले तर औषध म्हणून वापरले जाते. आयुर्वेदात लवंग खाण्याचे अनेक फायदे सांगण्यात आले आहेत. खासकरून पुरुषांसाठी लवंग खाण्याचे मोठे फायदे होऊ शकतात. लैंगिक आरोग्यासाठी लवंगचा आहारात समावेश केला पाहिजे.



पचनशक्ती चांगली असेल तर माणूस निरोगी राहतो. पचनसंस्था ही अन्नाचे ऊर्जेत रूपांतर करते. त्यामळे शरीराला पोषण मिळते आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, पण जर पचनसंस्था कमकुवत असेल तर तुम्हाला पोटाशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

यकृत खराब होण्याची समस्या वाढत आहेत. खास करुन पुरुषांमध्ये याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे स्वत:ला निरोगी ठेवण्यासाठी यकृत निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. यकृत खराब झाले तर शरीराची कार्य करण्याची क्षमता कमी होत जाते. यकृताची योग्य काळजी घ्यायची असेल, तर भरपूर पाणी प्यायला हवे, सोबत आहाराकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. लवंगमध्ये मोठ्या प्रमाणात अँटिऑक्सिडंट असतात, ज्यामुळे ते अवयवांचे, विशेषत: यकृताला मुक्त रॅडिकल्सच्या प्रभावापासून संरक्षित करते.

पुरुषांसाठी लवंग खूप फायदेशीर ठरू शकते. ज्यांचे लैंगिक आरोग्य व्यवस्थित नसेल तर लवंग खाण्याचा सल्ला दिला जातो. कामोत्तेजक किंवा लैंगिक उत्तेजना वाढवण्यासाठी लवंगचा वापर केला जातो.

मधुमेह टाळण्यासाठी खाण्याच्या सवयी सुधाराव्या लागतील. लवंग हे मधुमेहावर खूप चांगले औषध आहे. लवंगाचा उपयोग अनेक रोगांवर उपचार म्हणून केला जातो. मधुमेह होऊ नये म्हणून लवंगचा आहारात उपयोग करावा.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असेल करण्यासाठी लवंगचे सेवन केले पाहिजे. कारण रोगप्रतिकारशक्ती मजबूत असेल तरच तुम्हाला आजारांपासून लांब राहता येते. विषाणू, बॅक्टेरिया इत्यादींच्या संसर्गापासून ते शरीराचे संरक्षण करते. आयुर्वेदात काही औषधी वनस्पतींचे वर्णन केले आहे जे रोगप्रतिकारक शक्ती विकसित करण्यास मदत करतात. अशीच एक औषधी वनस्पती म्हणजे लवंग.

**(ही माहिती सामान्य माहितीच्या आधारावर देण्यात आली आहे. कोणतीही समस्या असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.)**

# शिक्षकांनी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे!

## आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे प्रतिपादन



**मुरुड : प्रतिनिधी**

विविध शाळांतून शिकवण्याचे काम करणारे शिक्षक एकच कृती जास्त करतात ते म्हणजे शिकवताना त्यांचे डोके जास्त चालते परंतु आपले शरीर देखील आरोग्य संपन्न ठेवणे गरजेचे आहे.तरच सशक्त पिढ्या ते घडवू शकतील. भारत हा जगातील सर्वात जास्त तरुणांची संख्या असलेला देश आहे.परंतु मोबाईलच्या अती वापरामुळे त्यांना अवकाळी म्हातारपण येणार असल्याने कोणत्याही स्क्रीन पासून लांब राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन कोकण विभागीय शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी खोपोलीच्या माधवबाग हॉस्पिटल तर्फे आयोजित जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ समारंभात बोलताना केले.

रायगड जिल्ह्यातील सोळा तालुक्यातील विविध शाळांमधून शिक्षण संस्कार, समाजहितासाठी योगदान देणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे , हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. राहुल जाधव, डॉ गुरुदत्त अमिन,डॉ प्रमोद मनोहर , महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना अध्यक्ष दिलीप म्हसे , तुषार पाटील, विनोद डाकी ,लकीचंद ठाकरे, दीपक मोकल आदींच्या हस्ते शाल श्रीफळ गुलाब पुष्प, प्रशस्ती पत्र तसेच स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ अमिन यांनी शिक्षकांना होणारे आजार व त्या वरील साधे आयुर्वेदिक उपचार,योग साधना,व्यायाम व आहाराचे महत्त्व स्पष्ट केले.आपल्या आमदार निधीतून आपण बर्याच शाळांना मदत केली असून आगामी काळात शंभर ते दोनशे करोड निधीची उलाढाल करणार आहे.कोणत्याही पुरस्कारापेक्षा शिक्षक पुरस्कार हा मोठा पुरस्कार असल्याचे सांगितले

# मुंबई विद्यापीठाची रायगडात सागर किनारा स्वच्छता अभियानास प्रतिसाद




**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून व मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष विशेष कार्य अधिकारी प्रा. सुशिल शिंदे व रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल यांच्या नियोजनाने रायगड जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा उपक्रमाचा एक भाग म्हणून सागर किनारा स्वच्छता अभियान हाती घेण्यात आले होते. समुद्रकिनारे आणि जलाशय स्वच्छ ठेवून सागरी जीवनाचे संरक्षण करणे आणि कचरा व्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

या सागर किनारा स्वचछता अभियानात रायगड जिल्ह्यातील जे.एस.एम.महाविद्यालय अलिबाग, एल. एस. पी. एम. कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चोंढी,पी.एन.पी. कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वेशवी,वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय मुरूड-जंजिरा, अंजुमन इस्लाम पदवी महाविद्यालय मुरूड- जंजिरा, कोकण ज्ञानपीठ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उरण, विरवाजेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उरण,उरण एज्युकेशन सोसायटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उरण, डी.डी. विसपुते महाविद्यालय पनवेल,गोखले एज्युकेशन सोसायटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धन ही महाविद्यालये ,तसेच या महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ८७९ स्वयंसेवक व राष्ट्रीय सेवा योजनेचे ४३ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

सागर स्वचछता अभियानाचा एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील अलिबाग,वरसोली,किहीम ,उरण मधील पिरवाडी, मुरुड मधील मुरूड-जंजिरा,नेरळ मधील प्लाम, श्रीवर्धन मधील श्रीवर्धन आदी सागर किनाऱ्याची स्वच्छता केली व ४५१० किलो कचरा संकलित केला

### अलिबाग नगरपरिषद

ता. अलिबाग, जि. रायगड – ४०२२०१

**जाहीर निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकरीता खालील प्रमाणे इच्छूक उमेदवारांद्वारे ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| | अलिबाग नगरपरिषदेकरीता Air quality monitoring unit करीता wire / cable खरेदी करणेबाबत. | दि.२३/०९/२०२५ ते ०१/१०/२०२५ वेळ : सायंकाळी ४.०० पर्यंत |

सदर विषयी अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभाग येथे उपलब्ध आहे.

जा.क्र. २४८१

दिनांक : २२/९/२०२५

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६.

दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२

Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४६४/४७७/२०२५ दिनांक : २२/९/२०२५

**जाहीर सूचना बाजारभावाकरिता**

| अनु.क्र. | ई-निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| | निविदा-पमपा/ मातंवि/२१२५ प.क्र.०३/३४६/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिकेतील संगणक, नेटवर्क आणि इतर संगणकीय साहित्याचे कामकाज, निगा-दुरुस्ती व देखभाल करणेबाबत बाजारभाव मागवित आहोत. |

या निविदेबाबतची माहिती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर दि. २३/०९/२०२५ ते दि. २९/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावीत. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका

# पोस्को कंपनीत परिसंस्था आणि शेतीविषयक सुसंवाद

**माणगांव: बातमीदार**

पोस्को कंपनीत शुक्रवारी (दि.१९) सकाळी ११.३० ते दुपारी १.३० दरम्यान परिसंस्था व शेती विषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. कंपनीचे संचालक जी युन पार्क, व्यवस्थापन प्रमुख महेंद्र तट्टे, कृषिभूषण राजेंद्र भट, पंचायत समिती कृषी विस्तार अधिकारी माणगाव अशोक मारकड व कृषी अधिकारी विशाल जाधव प्रमुख पाहुणे होते.

संचालक जी युन पार्क यांनी पोस्को सामाजिक उपक्रमांत नेहमीच सक्रिय राहते असे सांगत भविष्यात आणखी उपक्रम राबवण्याचे आश्वासन दिले. शेतकरी उत्पादक संस्था का आवश्यक आहे याची सोप्या भाषेत माहिती देउन स्थानिक भाज्यांचे महत्त्व आणि आरोग्यदायी आहाराची गरज आहे. मृग व हस्त नक्षत्रातील नायट्रोजनयुक्त



पाणी शेतात साठवावे. जल व मृदा संधारण, जैवविविधतेसाठी वृक्षलागवड, कुड्याच्या पानांचा कीड नियंत्रणासाठी कसा उपयोग होतो कोकणातील भात लागवडीचे वैशिष्ट्य व 'कोकण सुगंध तांदूळ' या नव्या संशोधनाची माहिती. बदलापूर येथे ५ एकर शेतात 'निसर्गमित्र' फार्मद्वारे १८७ हून अधिक वनस्पतींची लागवड, ३३ वर्षांपासून सेंद्रिय शेतीचा प्रयोग, पाण्याची बचत, मातीची सुपीकता वाढवणे व जैवविविधता संवर्धन ही त्यांची मुख्य वैशिष्ट्ये याची माहिती राजेंद्र भट यांनी दिली.

# खोपोली-खालापुरात भक्तीपूर्ण वातावरणात देवी, घटाची प्राणप्रतिष्ठा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-खालापुरात सोमवारी दुपारपर्यंत सर्व सार्वजनिक मंडळाच्या सभामंडपात पवित्र देवीच्या मुर्तीची व घटाची विधीवत पुजा-अर्चा करुण प्राणप्रतिष्ठा होऊन स्थापना करण्यात आली .

बच्चेकंपनी, महिला व खास करून तरुणाईचा उत्साहचा महोत्सव म्हणजे नवरात्र उत्सव . गणपती महोत्सव संपताच मागील पंधरा दिवस सर्वत्र नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी सुरू होती . सोमवारी या ऊर्जा व आनंदाच्या महोत्सवाला मोठ्या उत्साही वातावरणात सुरुवात झाली. सर्व ठिकाणच्या मंडपात पारंपरिक पध्दतीने व मोठ्या भक्ती आणि श्रद्धेने देवीची मूर्ती आणि पवित्र घटाची प्राणप्रतिष्ठा होऊन स्थापना पार पडली.यावर्षी खोपोलीत ३२ च्यावर सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरे केले जात आहेत. खालापूर शहर व संपूर्ण तालुक्यात ही गावोगावी नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.

## अग्निशस्त्र आणि जिवंत काडतुस जप्त

**महाड :** तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक२१ रोजी मौजे आमडोशी फाटा येथेएक व्यक्ती बेकायदेशिररित्या विक्री करण्याचे उददेशाने एक अग्निशस्त्र व एक जिवंत काडतुस बाळगलेल्या स्थितीत मिळुन आल्याने तसेच त्याच्याकडे सदरचे अगिशस्त्र कोणाचे आहे याबाबत माहिती घेतली असता त्याने सदरचे अग्निशस्त्र कोथुर्डे सोनारवाडी,येथिल व्यक्तीचे असल्याचे सांगितले

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४७०/४८३/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

**जाहीर निविदा सूचना**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | Tender No. : PMC/IT/10/2025 | पनवेल महानगरपालिकेत KIOSK Machine खरेदी करणेबाबत | 65,01,800/- |

या ई-निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २३/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका

### जहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड, येथील जमीनीचे मुळ मालक सौ. अस्मिता सौरभ तांडेल, आणि श्री. ओमकार भाऊ पारवे, यांचेकडून आमचे अशिलांनी खरेदी करणेचे ठरविले आहे, सबब सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तूत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड,**

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २५९ | १ | ०-२९-४० पो.ख. ०-०३-५० **एकूण क्षेत्र ०-३२-९०** | ६.८७ |

सदरहू मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही भागावर करार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्तखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क, हितसंबध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबध नाही असे समजण्यात येईल व सदरहू मिळकतीचा वरीलप्रमाणे व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या तक्रारी, दावे अगर हरकती यांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०९/२०२५

सही/-
**ॲड. स्वानंद भा. नवाळे.**
बी. एस. सी. एल. एल. बी.

पत्ता :- शॉप नं. ८, श्री. लक्ष्मी बिल्डींग, को. ऑप. हौ. सोसायटी, गोदरेज प्लाजा समोर, टिळक रोड, पनवेल.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार कांचन संजय जुईकर व जगदीश मंगळ कराळे यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली, तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १३२/२/अ | १ | ०-१३-९० | ०-०२-३० | ०-१६-२० | ३.१२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०९/२०२५

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | उलवे १७६४ | वहाळ ३/९४ | ४२०/१<br>४२३/०<br>४२५/२<br>४२५/३<br>४२६/५ | ०-४-०<br>३-७९-०<br>०-२१-५<br>०-१७-०<br>०-९-० | ४२०० चौ.मी. पैकी १४०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र.१२२A, सेक्टर-२३, क्षेत्र-१३९९.८३ चौ.मी. | **कै. शरद उद्धव म्हात्रे उर्फ शिवराम उंदीर म्हात्रे (मयत) यांचे वारस** १) श्रीमती सरोज शिवराम म्हात्रे, २) श्रीमती संगीता केशव पाटील, ३) श्रीमती ललीता अरुण पाटील, ४) श्रीमती रंजना अनिल पाटील व ५) निलम कमलाकर कडू **(वादी) व** प्रतिवादी क्र.३) श्री. अनिल शरद म्हात्रे उर्फ अनिल शिवराम म्हात्रे प्रतिवादी क्र.४) श्री. राजन शरद म्हात्रे उर्फ श्री. राजन शिवराम म्हात्रे | मा. उच्च न्यायालयात दाखल दुसरे अपिल क्र. ४१३/२०१७ (सिव्हील ॲपलिकेशन क्र.४८६/२०१९) तडजोड पुरशीसनुसार |
| २ | | वहाळ ५७४ | ४१३/५ब<br>४१३/४ | ०-२९-४<br>०-५-० | | | | |
| ३ | | वहाळ ५७४ | ४१५/२पै | ०-१३-० | | | | |
| ४ | १११ खारघर | ओवे ६६ पी | ३३१/०पै | ०-२२-० | २०० चौ.मी. | भुखंड क्र. २०७, सेक्टर- १९, क्षेत्र - २०० चौ.मी. | कै. सोंग्या गोपाळ म्हात्रे (मयत) यांचे वारस<br>१.१) जनार्दन सोंग्या म्हात्रे<br>१.२) ज्ञानेश्वर सोंग्या म्हात्रे<br>१.३) कै. कृष्णा सोंग्या म्हात्रे (मयत) यांचे वारस<br>१.३.१) गंगुबाई कृष्णा म्हात्रे<br>१.३.२) चंद्रकांत कृष्णा म्हात्रे<br>२. कृष्णा गोपाळ म्हात्रे<br>३. कै. मंजीबाई ऊर्फ मंजुबाई नारायण पाटील (मयत) यांचे वारस<br>३.१) धनाजी नारायण पाटील<br>३.२) सुरेश नारायण पाटील<br>४. कै. हरीबाई उर्फ शिमगीबाई नामा उर्फ नामदेव पाटील (मयत) यांचे वारस<br>४.१) सुमन राम खानावकर<br>४.२) लिलाबाई उर्फ राजश्री चंद्रकांत पाटील<br>५. कै. मैना उर्फ मैनाबाई रामदास ठाकूर उर्फ पाटील (मयत)<br>५.१ प्रभुदास रामदास ठाकूर<br>६. निरा मारुती पाटील | मा. दिवाणी न्यायाधिश क्र. स्तर दावा क्र. सी. एस.क्र.२३/२००७ मधील तडजोड पुरशीसनुसार |
| ५ | | ओवे १८६ | ३३६/१ | १-२४-०<br>०-१०-४ | १२०० चौ.मी. पैकी ८७४ | भुखंड क्र.१२, सेक्टर-३५जी, क्षेत्र-८७४ चौ.मी. | | |
| ६ | खारघर २६६ | खारघर ३४० | ३५४/८<br>३६१/५<br>३६१/१<br>३१२/२ | ०-४४-६ | २१५० चौ.मी. | भूखंड क्र.११, सेक्टर-३५G, क्षेत्र - २१५० चौ.मी. | १.श्री.कान्हा महादू पाटील<br>२.श्री. चंद्रकांत महादू पाटील | निरंक |
| ७ | | खारघर ३५४ | ३४३/१ | ०-२४-८ | | | | |
| ८ | | खारघर ३५४ | ११६/७<br>३१७/२<br>३२०/१<br>३२०/९<br>३२०/११<br>४३९/५<br>३४१/४<br>३५०/१<br>३६९/०<br>४२७/१२ | १-८७-६ | | | | |
| | | | एकूण संपदित क्षेत्र | २-५७-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

सिडको/जनसंपर्क/२६२/२०२५-२६

# करंजा बंदरातील मच्छिमारांना दिलासा

**उरण : प्रतिनिधी**

प्रदीर्घ अवधीच्या वाटाघाटीनंतर प्रतिटन ८५ रुपयांऐवजी ६५ रुपयांची दरवाढ घेण्यात आला असून, बर्फच्या दरात झालेल्या वाढीमुळे बर्फ विक्रेते आणि मच्छिमारांमध्ये निर्माण झालेला तणाव अखेर संपूष्टात आल्याने मच्छिमारांना २० रुपये एवढा दिलासा मिळाला आहे. ही दरवाढ ही १ ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार आहे. याशिवाय पुढील २०२६ च्या वर्षीच्या १ जूनपर्यंत ही दरवाढ होणार नाही. असा निर्णय घेण्यात आल्याची माहिती करंजा मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली आहे.



ऑल इंडिया आइस मॅन्यूफॅक्चर असोसिएशन आणि विविध मच्छिमार संस्थाच्या प्रतिनिधीमध्ये तब्ब्ल तीन तास चाललेल्या चर्चेनंतर हा बर्फ भावाढीचा तोडगा निघाला. सुरुवातीला असोसिएशनने प्रति टन ८५ रुपयांची वाढ सुचवली होती, मात्र मच्छिमारांनी या दरवाढीला तीव्र विरोध केला. दरवाढ मान्य न केल्यास बर्फ पुरवठा बंद करण्याचा इशारा ऑल इंडिया आइस मॅन्यूफॅक्चर असोसिएशनने दिला होता. या पार्श्व भूमीवर करंजा मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी तातडीने बैठक घेण्याची विंनती केली होती.

त्यानुसार वाशी येथील मर्चंड जिमखाना येथे २० सप्टेंबर रोजी पार पाडण्यात आलेल्या बैठकीत ऑल इंडिया मन्यूफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष रसिक देसाई, प्रदीप नाखवा, रमेश नाखवा, नारायण नाखवा, चंद्रकांत कोळी व अमोल रोगे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत दोन्ही बाजूने चर्चा जोरदार चर्चा झाली. बर्फ उत्पादक ८५ रुपयांच्या दरवाढीवर ठाम होते. अखेर प्रदीर्घ चर्चेच्या बैठकीत प्रतिटन ६५ रुपयांची दरवाढ मान्य करण्यात आली. या दरवाढीत १ जून २०२६ पर्यंत कोणतीही अतिरिक्त वाढ न करण्याचेही या बैठकीत निश्चित करण्यात आले. त्यामुळे येथील मच्छिमारांना बर्फ दरवाढीचा दिलासा मिळाला आहे.



नवी मुंबई : नेरूळ सेक्टर ४२ ए येथील सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ सीवूड्सची देवी.

## एपीपीएल करंजाडेच्या ३३ विद्यार्थ्यांची प्रादेशिक पातळीवर चमकदार कामगिरी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एपीपीएल करंजाडेच्या ३३ विद्यार्थ्यांनी अबॅकस आणि मेंटल अरिथमॅटिक प्रादेशिक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यंदाची ही स्पर्धा १३ सप्टेंबर २०२५ रोजी आगरी कोळी सांस्कृतिक भवन, नेरुळ येथे आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेत नवी मुंबई, मुंबई, ठाणे, रायगड आणि इतर शहरांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत एपीपीएल लर्निंग सेंटर करंजाडेच्या विद्यार्थ्यांची कामगिरी विशेष ठरली आहे.

यामध्ये विजेते चॅम्पियन ऑफ चॅम्पियन भूमी दिंडे, चॅम्पियन ऋधिमा सोराठिया, प्रथम क्रमांक: अव्यांश कुमार श्रीवास्तव, अन्वेशा राजेशिर्के, कार्तिक्या वांकलया, शौर्य ईधाते, द्वितीय क्रमांक: अहाद लिखायत, अर्पण निकम, कृष्णप्रिया पाणमंड, शिवांग चौधरी, विराज पाटील, तृतीय क्रमांक: देवांशी पाटील, दक्षित जाधव, माही जुईकर, प्राणवी ठोंबरे, तन्वी म्हात्रे, संस्कृती पाटील, स्वोजस सावंत, स्वरा वीर, विवान कोठवळे, वेदश्री पुणेकर, चतुर्थ क्रमांक: श्रवण शेलार, अलोक कुऱ्हाडे, आराध्या कदम, देबामीत सूई, ध्रुव तांडेल, गायत्री पुणेकर, सान्वी कातले, ऋग्वेद घनवट, श्रेष्ठी बालखांडे, वेदांत परब, वेदू सुसमेर हे आहेत.

एपीपीएल लर्निंग सेंटर करंजाडेच्या विद्यार्थ्यांनी प्रादेशिक पातळीवर मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि केंद्राच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे. या यशामागे Ms. Sonali Pingale आणि Ms. Abida Makandar मॅडम यांचे मार्गदर्शन आणि सततचे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून, भविष्यातील स्पर्धांसाठी हे त्यांना मोठा प्रेरणास्थान ठरेल.

## अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अतिक्रमण विभागाने वाशी व कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी अंतर्गत जुहूगाव येथे घर क्र.३३८, जुहूगाव, यांचे इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु होते. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. हे अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली.

कोपरखैरणे विभाग अंतर्गत सेक्टर– १०,भूखंड क्रमांक १३, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली व ५० हजार रुपये असा दंड वसूल करण्यात आला आहे. अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत ऊ धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी चार मजूर, दोन इलेक्ट्रॉनिक हॅमर, पिकअप व्हॅन एक, जे.सी.बी एक यांचा वापर करण्यात आले.

## पनवेल मनपातर्फे पथविक्रेत्यांना स्वच्छता व अन्न सुरक्षा प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेअंतर्गत पनवेल महापालिकेमार्फत लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांतर्गत शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पनवेल प्रभागातील अन्नविक्रेता फेरीवाल्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.




प्रशिक्षणात अन्नविक्रेत्यांना विक्रीदरम्यान स्वच्छतेचे पालन कसे करावे, वैयक्तिक स्वच्छता, विक्रीसाठी योग्य जागेची निवड व परिसराची स्वच्छता या बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली. हे प्रशिक्षण श्री नॅलेटिकल लॅब या संस्थेकडून घेण्यात आले.

हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपायुक्त अभिषेक पराडकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने मॅडम, एनयूएलएम विभागप्रमुख नामदेव पिचड यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच एनयूएलएम विभागाचे शहर अभियान व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात व कर्मचारीही उपस्थित होते.

### निवडक

#### नवरात्रोत्सवानिमित्ताने कार्यक्रम

**पनवेल :** घटस्थापना आणि नवरात्र उत्सवानिमित्ताने पी मुरुगेसन ग्रामस्थ मंडळ दुन्द्राई (दुन्द्रे) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २२ सप्टेंबर रोजी महालक्ष्मी मातेची महापूजा आणि महाआरती होणार आहे. २३ सप्टेंबर रोजी भजन आणि श्री भैरवदेव देवींची गाणी होणार आहेत. २४ सप्टेंबर रोजी श्री साईनाथ नाच मंडळ धोदानी, २५ सप्टेंबर रोजी हरिपाठ आणि भजन होणार आहे २६ सप्टेंबर रोजी वाघेश्वर महिला नाच मंडळ वाघाची वाडी, २७ सप्टेंबर रोजी भजन, २८ सप्टेंबर रोजी भजन , २९ सप्टेंबर रोजी हरिपाठ आणि भजन होणार आहे. ३० सप्टेंबर रोजी लालबाग येथील महिलांचे भजन आणि श्री राम प्रसादिक भजन मंडळ चिंचवली यांचे भजन होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

#### शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल :** वनवासी कल्याण आश्रम चिंचवली, पनवेल येथील रक्षिता ढोणे व त्यांचे पती मनोज ढोणे यांनी त्यांच्या घरी गणपती बाप्पा चरणी आलेले शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम केला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून मुलांना त्यांच्या पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास चिंचवली येथील उपसरपंच महेश पाटील, शिवसेना पनवेल उप तालुका प्रमुख व दुदंरे ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, ग्रामस्थ ज्ञानेश्वर शेळके व त्यांची पत्नी, गुरुनाथ भोपी, ॲड. रेश्मा गुरुनाथ भोपी, उपस्थित होते.

## पनवेलमध्ये दृष्टीहीन कलाकारांच्या वाद्यवृंदाने जिंकली मने

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे नुकतेच पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये इको बिट्स या वाद्यवृंदाचे आयोजन आपल्या विविध उपक्रमांसाठी निधी जमा करण्यासाठी केले होते. विशेष म्हणजे या वाद्यवृंदामधील सर्व कलाकार हे दृष्टीहीन होते. दोन आवाजात गाणारे श्रवण कुमार हे या कार्यक्रमाचे मोठे आकर्षण होते. त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध हिंदी मराठी गीते सादर करुन मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या प्रेक्षकांना मोहुन टाकले.



कार्यक्रमाचे सुरुवातीला सरगम क्लबचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी क्लबच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाला प्रांतपाल संजीव सुर्यवंशी, प्रथम प्रांतपाल प्रवीण सरनाईक, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, लायन्स डिस्ट्रिक्टचे खेमंत टेलर, आर पी पांडे, सत्यपाल चूघ, धर्मपाल चूघ, सुयोग पेंडसे आदी उपस्थित होते. तसेच पनवेल लायन्सचे अशोक गिल्डा, एस जी चव्हाण, न्यू पनवेल स्टील टाऊनचे गैरोला, ठाकरे, वाय पी सिंग, द्रोणागिरी क्लबचे भूमिका सिंग, सागर चौकर, मोनिका चौकर हे सुद्धा उपस्थित होते. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी आपले शुभेच्छा संदेश पाठवले होते.

पनवेलकर रसिकांनी भरघोस प्रतिसाद दिलेला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरगम क्लबचे सचिव आदित्य दोशी, खजिनदार धवल शहा, संजय गोडसे, स्वाती गोडसे, मानदा पंडित, अल्केश शहा, अनिल परमार, जयेश मणियार, राजेंद्र महानुभाव, संध्या महानुभाव, मिलिंद जोशी, ओंकार खेडकर, संविदा पाटकर, सुषमा पन्हाळे, महेंद्र लोहार, अश्विनी खेडकर यांनी खूप परिश्रम घेतले.

### नवरंग रंग पांढरा



रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर



नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, शिरवणे

### दुर्गामाता दौड (माळ पहिली)



पनवेल : शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. या नवरात्र उत्सवात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेलमार्फत श्री दुर्गामाता दौड काढण्यात येते. गेली अनेक वर्ष प्रतिष्ठान पनवेलमध्ये दौड काढत आयोजित आहे. पहिल्या दिवशी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या स्मारकापासून दौडीची सुरवात करण्यात आली. तिथून हनुमान मंदिर, गावदेवी माता मंदिरामध्ये दौड येऊन तिथे देवीची आरती करण्यात आली व श्लोक घेण्यात आले. नंतर ही दौड सावरकर चौक, कर्मवीर भाऊराव पाटील चौक आणि नंतर शेवटी पुन्हा महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी येऊन धेयमंत्र घेऊन सांगता करण्यात आली.

## ऋषिकेश धुरी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**उरण : रामप्रहर वृत्त**


सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल धुरी ऋषिकेश महादेव यांना कोकण विभागाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.



सध्या ते रायगड जिल्ह्यातील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे (५ वर्ष) कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या या दीर्घ अनुभवामुळे आणि योगदानामुळे त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे या शाखेमार्फत सत्कार करण्यात आला.

या वेळी फुंडे ज्युनियर कॉलेजच्या स्थानिक स्कूल कमिटी चे अध्यक्ष कृष्णाजी कडू, विद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य साळुंखे सर, उपमुख्याध्यापिका थोरात मॅडम, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख माने, कला विभाग प्रमुख पाटोळे तसेच विद्यालयातील सर्व रयतसेवक उपस्थित होते.

## वाहनचालकांसाठी आज नेत्र तपासणी शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल बेलापूर यांच्या आयुक्त विद्यमाने लोकनेते श्री रामशेठ ठाकूर यांच्या अमृत वर्ष निमित्त मंगळवारी (दि.२३) सकाळी १० ते ३.०० या वेळेत पेट्रोल पंप सेक्टर, १९ खारघर येथे वाहन चालकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

या शिबिराचे उद्दिष्ट वाहन चालवणाऱ्या नागरिकांचे दृष्टी स्वास्थ्य तपासणे व त्यांना नेत्रविकारांपासून संरक्षण मिळवून देणे हे आहे. या उपक्रमात खारघर येथील वाहन चालकांच्या वेगवेगळ्या मोफत तपासण्या करण्यात येणार आहेत त्यामध्ये प्रामुख्याने नेत्रतपासणी, रक्तदाब तपासणी तसेच डोळ्यांच्या आरोग्यविषयी सल्ला ही देण्यात येणार आहे. तसेच या नेत्र शिबिरात अपोलो हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी हे सेवा देणार आहेत तसेच शिबिरादरम्यान लाभार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक सक्रिय सहभागाने घेणार आहेत तसेच जनसेवा व आरोग्यविषयक जनजागृती करणार आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी या नेत्र तपासणी शिबिराचे लाभ घेण्यासाठी खारघर मधील सर्व वाहन चालकांसाठी आवाहन केले आहे.

# पेणच्या शेणे आदिवासीवाडीत 'आदी कर्मयोगी'

## शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोहचण्याचा उद्देश –जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे.

रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ११३ गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यामुळे जिल्ह्यात आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात झाली असून पेण तालुक्यातील शेणे आदिवासी वाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत झाला.



या वेळी पेण विधानसभा आमदार रविशेठ पाटील, उपविभागीय अधिकारी पेण, प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, गट विकास अधिकारी लेंडी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, नायब तहसीलदार कालेकर, सरपंच, उपसरपंच यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, आदी कर्मयोगी अभियानांतर्गत आपल्याला गावाचा विकास आराखडा तयार करायचा आहे. त्या आराखड्याला २ ऑक्टोबर रोजी आपल्या ग्रामसभेत ठेवून मान्यता घेऊन ती सर्व कामे भविष्यात आपल्याला करायची आहेत. आदिवासी बांधवांसाठी दळी जमिनीचे प्लॉट किमान निश्चिती करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या.

जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जिवंत सातबारा, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र दाखल्यांचे वाटप आपण वर्षभर राबवित आहोत. महसूल विभागाचे राजस्व अभियान व ग्रामविकास विभागाचे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान यांचा उद्देश तळागाळातील आदिवासी बांधवांना सशक्त करणे व गावांचा सर्वांगीण विकास साधणे त्याचप्रमाणे शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोहोचविणे हा आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

या वेळी आमदार रविशेठ पाटील आणि उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते धरती आबा योजनेंतर्गत दाखल्यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांनी केले.

## निवडक

### चिंचवली येथील विद्यार्थ्यांचे सुयश

**खोपोली :** राज्यस्तरीय स्पर्धेत खोपोली चिंचवली येथील स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयातील पाचवीतील अंकिता कैलास रणशूर व संस्कार शरद राजगे या विद्यार्थ्यांची निवड झाली. रायगड जिल्ह्यातील निजामपूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात या परीक्षा झाल्या. यात या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक श्रीराम पवार, शिक्षिका तेजस्विनी घोडके, व प्रमिला कर्णक यांनी विशेष मार्गदर्शन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, प्रशासन अधिकारी जयश्री धायगुडे, केंद्र समन्वयक लियाकत पठाण इत्यादी मान्यवरांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### काळभैरवनाथ देवस्थानचा नवरात्रोत्सव

**पोलादपूर :** तालुक्यात विविध ग्रामदैवतांसह आदिशक्ती देवींच्या विविध अवतारातील मंदिरातील नवरात्रौत्सव सोमवारपासून सुरू झाला असताना पोलादपूर शहराचे आराध्य ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानचा नवरात्रौत्सव येत्या सोमवार २२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू झाला आहे. या सोहळ्याची सांगता येत्या २ ऑक्टोबरला पोलीस ठाण्यात विजयदशमीनिमित्त सिमोल्लंघनाने होणार आहे. पोलादपूरच्या ग्रामदैवतांचे श्रीकाळभैरवनाथ, श्रीजोगेश्वरी, श्रीरवळनाथ, श्रीकाळकाई आणि श्रीमरीआई असे पंचायतन आहे.

### राजू मोरे यांना पुरस्कार

**माणगाव :** लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१–४ आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पेण–रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात गोरेगाव विभागातील कुरवडे गावचे सुपुत्र, तंत्रस्नेही शिक्षक राजू मोरे यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सोबतच पडसरे आश्रमशाळेचे माध्यमिक विज्ञान शिक्षक गणेश महाडिक यांनाही उत्कृष्ट शिक्षक सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. या वेळी लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संजीव सुर्यवंशी, एमएच यशवंत चित्रे, सेक्रेटरी प्रवीण सरदेसाई, प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ पालीचे अध्यक्ष रवींद्र लिमये, सहाय्यक प्रकल्प अधिकारी मारुती गायकवाड, प्राचार्य वैशाली पाटील, पडसरे आश्रमशाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक संदीप शिंदे, प्राथमिक मुख्याध्यापिका ढोपे आदी उपस्थित होते.



## 'जेएसएस'तर्फे सहाण येथे डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जनसामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून सोमवारी (दि.२२) सहाण–अलिबाग येथे डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन करण्यात आले तसेच आर्थिक साक्षरता स्वच्छता सेवेसाठी प्रेरक असल्याचे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी कार्यक्रमावेळी व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगड च्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय



प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आता पर्यंत ७० हजारपेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून सहाण–अलिबाग येथे डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन

या उपक्रमावेळ संचालक डॉ. विजय कोकणे, धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगडचे संचालक सचिन चव्हाण, अकाउंट मॅनेजर प्रतिक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, समन्वयक ममता पाटील, स्टाफ मेंबर रिद्धी पाटील, अजय पाटील, हिमांशू भालकर तसेच प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## पोलादपूरमध्ये मेकअप स्पर्धा आणि कापडी पिशव्यांचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जनसामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जनजागृती, कौशल्य विकास उपक्रम आदींना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून शनिवारी पोलादपूर येथे स्वच्छतेवर आधारित मेकअप स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि सार्वजनिक स्वच्छता जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमावेळी समन्वयक ममता पाटील यांच्या माध्यमातून स्वछतेची शपथही देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमय्या, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय





कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात जनशिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्षापासून सक्रियपणे सुरु आहे व आतापर्यंत ७० हजारांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून पोलादपूर येथे स्वच्छतेवर आधारित मेकअप स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि सार्वजनिक स्वच्छता जनजागृती या उपक्रमावेळी समन्वयक ममता पाटील, प्रशिक्षिका अस्मिता उमेश पवार व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात झाला.

**माणगाव : सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ खरवली येथील अंबा मातेचे शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र माणकर व सहकारी यांनी दर्शन घेतले.**



## रोहा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची सभा

**रोहा : प्रतिनिधी**

१९ कोटींची उलाढाल असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित रोहाची ४९वी वार्षिक सर्वसाधारण सभा रोहयातील जेष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या वेळी चेअरमन प्रदीपकुमार खाडे, व्हा. चेअरमन सौ अमिता बामणे, चिटणीस प्रशांत चोरगे, सहचिटणीस सुनील चोगले, मा. चेअरमन संतोष यादव, अजय कापसे संचालक, किशोर जाधव, नारायण गायकर, शशिकांत शेळके, विजय धोत्रे, सचिन मुसळे, ईश्वर लाडे, ब्रिजेश भादेकर, सौ. समीक्षा जुवेकर, ज्येष्ठ शिक्षक सुरेश मोरे, येळेकर सर, क्लाब सर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करण्यात आले. स्वागत गीत रमेश खरीवले व शिक्षक टिमने सादर केले. या सभेत संस्थेचा मागील वार्षिक आढावा, तेरीज, ताळेबंद, पुढील अंदाज पत्रक हे विषय घेण्यात आले. या कार्यक्रमात सदस्य असलेल्या शिक्षकांच्या गुणवंत मुलांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक प्रसाद साळवी व हेमकांत गोयाजी यांच्यासह तालुक्यातील गुणवंत शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी चेअरमन प्रदीपकुमार खाडे, मा. चेअरमन संतोष यादव व ज्येष्ठ शिक्षक सुरेश मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन व आभार नारायण गायकर यांनी मानले.





**रोहा : तालुक्यातील पडम येथील जाखमाता देवीचे नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने सजवलेले रूप.**

## समूहगान स्पर्धेत परसुले आणि लोहारे शाळेला विजेतेपद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील आकार प्रतिष्ठान कापडे बुद्रुक तर्फे साने गुरुजी माध्यमिक विद्यालय लोहारे येथे आयोजित करण्यात आलेल्या समूहगान स्पर्धेमध्ये रायगड जिल्हा परिषदेची परसुले प्राथमिक शाळा आणि लोहारे येथील साने गुरूजी माध्यमिक शाळेचे गायन समूह अनुक्रमे प्राथमिक आणि माध्यमिक गटामध्ये विजेते ठरले आहेत. या स्पर्धेवेळी ५ व ८ वी शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांचादेखील सन्मानसोहळा आकार प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आला.

या वेळी व्यासपिठावर सहयोग प्रतिष्ठानचे सहयोगचे संस्थापक अध्यक्ष विनायक चित्रे, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, डॉ.अक्षय माळवदे, कोमसाप पोलादपूरचे माजी अध्यक्ष जयंत भा.देशपांडे, कापडे हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक हिंदूराव माळी, आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे, उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रविकांत सकपाळ, माजी मुख्याध्यापक अ.वि.जंगम, परिक्षक अनिल पवार, मोरे मॅडम, अविनाश जंगम तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी इयत्ता ५ व ८ वी शिष्यवृत्तीप्राप्त आर्या सलागरे, संस्कार भोईर, सान्वी पवार, भार्गवी दिक्षित, स्नेहा शेलवणे, तनिषा मोरे, अनिकेत मांगले, वेदांत पवार, श्रावणी इंगवले आदी विद्यार्थ्यांचा सन्मान या वेळी करण्यात आला.

शनिवारी दिवसभर सुरू असलेल्या समूहगायन स्पर्धेत प्राथमिक विभागाचे सात समूह तर माध्यमिक विभागाचे पाच समूह सहभागी झाले. यामध्ये राजिप शाळा परसुले प्रथम क्रमांक तीन हजार रूपये व चषक, लोहारे राजिप शाळा द्वितीय क्रमांक दोन हजार रूपये व चषक आणि चिरेखिंड प्राथमिक शाळा तृतीय क्रमांक एक हजार रूपये व चषक आणि माध्यमिक विभागामध्ये लोहारे साने गुरूजी माध्यमिक शाळा प्रथम क्रमांक तीन हजार रूपये व चषक, वरदायिनी माध्यमिक शाळा द्वितीय क्रमांक दोन हजार रूपये व चषक तर न्यू इंग्लिश स्कूल साखर तृतीय क्रमांक एक हजार रूपये व चषकाचे मानकरी ठरले. व्यासपिठावरील आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे व मान्यवरांच्याहस्ते सर्व विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी साखर न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक सुभाष ढाणे यांच्या आगामी सेवाकाळपूर्तीबद्दल तसेच कापडे हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक अ.वि.जंगम यांचा ७५ वर्षपूर्तीबद्दल आकार प्रतिष्ठानतर्फे सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अध्यक्ष अजय सलागरे यांनी केले तर पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन अमर सलागरे यांनी केले.





## बाजारात झेंडूची मोठी आवक

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवरात्र उत्सवामुळे झेंडूच्या फुलांना मोठी मागणी आहे. त्यामुळे बाजारात झेंडूची आवक वाढली आहे. गणेशोत्सवानंतर घसरलेले फुलांचे दरदेखील वाढल्याचे पहायला मिळत आहेत.

गणेशोत्सवात चांगल्या प्रतीचा झेंडू प्रतिकिलो २०० रूपये दराने विकला जात होता. त्यानंतर पितृपंधरवडयात झेंडूच्या फुलांची मागणी घटली होती त्यासोबत दरदेखील खाली आले होते. आता पुन्हा फुलबाजारात झेंडुची चलती सुरू झाली आहे. रविवारी सर्वपित्री अमावस्या आणि त्यानंतर सोमवारपासून नवरात्रोत्सव सुरू झाली आहे. या वेळी पूजा अर्चा करण्यासाठी झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. दरवर्षी नवरात्रौत्सवासाठी




फुलांच्या मागणीचा विचार करून अनेक शेतकरी झेंडूची लागवड करतात. या वर्षी पावसाचा मुक्काम लांबल्याने झेंडूच्या फुलांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी फुले पावसामुळे कुजून गेली आहेत. त्यामुळे झेंडूचा भाव वधारला आहे. प्रतिवर्षी १२० ते १५० रुपये किलोने मिळणारा झेंडू यावर्षी २०० रुपये पार झाल्याने भाविककांमध्ये नाराजी आहे, मात्र पूजेसाठी आवश्यक असणारी फुले कमी प्रमाणात का होईना ग्राहक खरेदी करताना दिसत आहेत.

अलिबागच्या मुख्य बाजारपेठेत शनिवारी झेंडूची फुले खरेदीसाठी नागरीकांनी गर्दी केली होती. नाशिवंत माल असल्याने सणाची संधी साधत शेतकरयांनी मोठया प्रमाणावर झेंडूची काढणी केली आहे. अलिबाग शहरातील बाजारपेठ तसेच रस्त्याच्या कडेला झेंडूच्या फुलांचे ढीग पहायला मिळत आहेत.

## किल्ले मानगडाची विंझाई

स्वराज्याची राजधानी दुर्गदुर्गेश्वर रायगडाचा उपदुर्ग मानगडाची गडदेवता म्हणून विंझाई देवी ओळखली जाते. किल्ले मानगडाच्या ऐतिहासिक कागदपत्रांमधून गडावर विंझाई, भैरव आणि सबजाई अशा तीन दैवतांचा उल्लेख आढळतो. यातील श्री विंझाईचे मंदिर सध्या गडाच्या मध्यावर असलेल्या विंझाई खिंडीत आहे. शिवपूर्वकाळात मानगडाला विंझाईचा किल्ला असेही बोलले जात असे. आजमितीस सुस्थितीत बनवलेल्या कौलारू मंदिरात सतराव्या शतकातील काळ्या पाषाणातील महिषासुरमर्दिनीच्या रूपातील विंझाईची मूर्ती विराजमान झालेली दिसून येते.



विंझाई देवीचे मंदिर पूर्वाभिमुख असून, शेजारीच वेताळाचे स्थान तांदळा स्वरूपात दिसून येते. विंझाई ही प्रामुख्याने चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंची कुलदेवता मानली जाते. विळेकर देशमुख वंशाचा मुळ पुरूष रामप्रभू यांनी उत्तर हिंदुस्थानातून विंझाईची मूर्ती आणून ताम्हिणी या गावी स्थापना केल्याची आख्यायिका सांगितली जाते. विळे येथील शिक्केकरी घराण्यात एक शिक्क्याचा छाप मिळाला होता. त्यावर श्री विंझाई चरणी तत्पर रंगाजीसुत साबाजी निरंतर, अधिकारी निजामपूर, नांगर असे वाक्य आणि त्याखाली नांगराचे चित्र पाहायला मिळते.

श्री विंझाईच्या वार्षिक पूजेचा मान येथील जाधव घराण्याकडे आहे. देवस्थानला ब्रिटिशांनी दिलेली सनद असून त्यात नवरात्रामध्ये दिवाबत्तीसाठी मानधनाची तरतूद केल्याचा उल्लेख आढळतो. मानगडाच्या विंझाई समोर चैत्रपौर्णिमा आणि दसऱ्याच्या दिवशी तळी भरतात. नवरात्रात अखंड नंदादीप तेवत असतो. जशी श्री रायगडाची शिर्काई तशीच मानगडाची श्री विंझाई तमाम बोरवाडी परिसरातील भक्तांचे श्रध्दास्थान आहे.

**–संतोष सुतार, माणगाव**

## सागरी सुरक्षा चषक साखळी कबड्डी स्पर्धा

# रोहा, मांडवा संघ विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सागरी सुरक्षा चषक साखळी कबड्डी स्पर्धेत रोहा फायटर्स संघाने विजेतेपद पटकावले. पद्मदुर्ग मुरूड हा संघ उपविजेता ठरला. किंग ऑफ पोयनाड संघाने तृतीय क्रमांक मिळवला. रोहा संघाचा रोशन मढवी याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट म्हणून गौरविण्यात आले. मुरूड संघाचा अनिरुद्ध भोसलेला उत्कृष्ट चढाईचे, तर रोहा संघाचा आशिष मोरेला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले.

महिलांमध्ये मांडवा संघ विजेता ठरला. दिघी सागरी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. पेण संघाने तृतीय क्रमांक मिळवला. उत्कृष्ट खेळाडू म्हणून म्हणून चैताली म्हात्रे हिची निवड करण्यात आली.

स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १६ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचा शुभारंभ मांडवा बंदरावर झाला. त्यानंतर मुरूड, रेवदंडा, श्रीवर्धन येथील समुद्रकिनारी स्पर्धेचे सकाळी सामने खेळविण्यात आले. उपउपांत्य फेरीपासूनचे सामने अलिबाग समुद्रकिनारी खेळविण्यात आले. उपांत्य व अंतिम फेरीचे सामने रविवारी (दि.२१) रंगले.

पुरुषांचा अंतिम सामना एकतर्फी झाला. रोहा फायटर्स संघाने या सामन्यात पद्मदुर्ग मुरूड संघाचा ३२-१२ असा सहज पराभव करून विजेतेपद पटकावले. पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मुरूड संघाने नागोठणे फायटर्स बुल्स संघावर ३१-२१ अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या



सामन्यात रोहा संघाने किंग्ज ऑफ पोयनाड संघाला ३६-३० असे पराभूत केले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात पोयनाड संघाने नागोठणे संघाचा २४-२० असा पराभव केला.

आमदार महेंद्र दळवी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर साळे, मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक सोमनाथ लांडे, सागरी सुरक्षा शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, सायबर सेलच्या रिझवान नादाफ, श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोयनाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, गायक चिंतामणी शिवडीकर, अलिबाग मच्छीमार सोसायटीचे अध्यक्ष विजय भगत, महादेव कोळी समाजाचे अध्यक्ष सुकुमार भगत, फैजल हुर्जुक, गणेश गावडे आदी या वेळी उपस्थित होते.

रायगड कबड्डी लीगचे अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष संजय पाटील, भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी स्पर्धेला भेट दिली. स्पर्धेचे समालोचन विश्वनाथ पाटील आणि संजय पोईलकर यांनी केले. रायगड पोलीस क्रीडा प्रमुख ऋषिकेश साखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड पोलीस खेळाडूंनी व कर्मचाऱ्यांनी तसेच अधिकारीवर्ग यांनी ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे तलवारबाजी स्पर्धेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा नुकतीच पाले बुद्रुक येथील पुष्पनिकेतन इंग्लिश स्कूल या ठिकाणी झाली. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

विद्यालयातील दुर्वेश बाळा म्हात्रे (बारावी सायन्स) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची मुंबई विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे, तर हर्षल विकास पाटील (अकरावी सायन्स) याने द्वितीय क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## कोळेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांची मॅरेथॉनमध्ये चमक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोळेवाडी गावाने यंदा दुहेरी आनंद अनुभवला. एकीकडे गती मॅरेथॉन स्पर्धेत कोळेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी दमदार झेप घेतली, तर दुसरीकडे आदर्श शिक्षक पुरस्काराने उपक्रमशील शिक्षक प्रमोद गायकवाड यांचा सन्मान झाला. या दोन्ही घटनांमुळे कोळेवाडी शाळा आणि गावाचा लौकिक दुमदुमून गेला.

संजय घोडावत ग्रुप आयोजित भव्य गती मॅरेथॉन स्पर्धेत कोळेवाडी शाळेतील तब्बल ६० विद्यार्थी सहभागी झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या शहरात आपली छाप पाडली, ही अभिमानास्पद बाब ठरली.

यामध्ये समृद्धी माने हिने द्वितीय क्रमांक, तर नयन तोडकरीने तृतीय क्रमांक मिळवत कोळेवाडीचे नाव उज्ज्वल केले. सर्व विद्यार्थ्यांनी पाच किलोमीटर अंतर यशस्वीरीत्या पूर्ण केले. या विद्यार्थ्यांचा प्रवास, खर्च व सोय सिद्धीविनायक कंपनीचे मालक कृष्णाशेठ यशवंत गोसावी यांनी केली.

स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना टी-शर्ट व मेडल देण्यात आले, तर विजेत्या विद्यार्थ्यांना चषक व सन्मानचिन्ह प्रदान करून विशेष गौरव करण्यात आला.

या उपक्रमाला स्वप्नील गोसावी, शुभम गोसावी आणि भाग्यश्री गोसावी यांचे सहकार्य लाभले. गावकऱ्यांनीही मोठ्या उत्साहाने साथ दिली.

## नेमबाज अवनी कोळीला दुहेरी रौप्यपदक



**उरण : प्रतिनिधी**

बारावी पश्चिम विभागीय शूटिंग चॅम्पियनशिप शॉटगन २०२५ ही मध्य प्रदेशातील भोपाळ येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एफवायबीएससी आयटीची विद्यार्थिनी अवनी अलंकार कोळी हिने ट्रॅप ज्युनियर महिला व तरुण महिला अशा गटात दोन रौप्यपदके पटकावली.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक, जिमखाना प्रमुख देवेंद्र कांबळे व सर्व जिमखाना सदस्य यांनी अवनीचे अभिनंदन केले.

## 'आरटीआयएससी'चा धावपटू मनोज म्हात्रे मॅरेथॉनमध्ये अव्वल



**उरण : वार्ताहर**

उरण येथील विजय विकास सामाजिक संस्थेमार्फत रविवारी (दि. २१) जेएनपीटी उरण मॅरेथॉनचे आयोजन टाऊनशिप येथे आयोजन करण्यात आले होते. यात ४० प्लस गटात अडीच किलोमीटर धावणे स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा खेळाडू मनोज बाळाराम म्हात्रे (चिरनेर) याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

मनोज म्हात्रे हा रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उलवे नोड येथे स्पोर्ट्स इन्चार्ज म्हणून उलवे येथे कार्यरत आहे तसेच चिरनेर येथील श्री महागणपती मित्र मंडळाचा पदाधिकारी आहे. त्याला मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे व्यवस्थापकीय संचालक परेश ठाकूर, चिरनेरचे आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच महागपती मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोजचे अभिनंदन केले.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत गव्हाण विद्यालयाची दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा न्हावे येथील लेडी खातून मरिअम विद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकतीच झाली. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी १० सुवर्णपदकांसह एकूण २३ पदके जिंकून पदकतालिकेत प्रथम क्रमांक पटकावला.

सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षक सुरेश पारखे यांचे अभिनंदन होत असून पुढील स्पर्धे साठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचेही कौतुक होत आहे. या वेळी विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत करण्यासाठी ज्येष्ठ शिक्षिका उज्ज्वला म्हात्रे उपस्थित होत्या.

विद्यालयाचे आधारस्तंभ तथा रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, प्राचार्य व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका



शशिकला पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले यांच्यासह पालकवर्गाने सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पदकविजेते विद्यार्थी

१४ वर्ष मुली गोळाफेक सानवी भोसले सुवर्णपदक, ६००

### १० 'सुवर्णां'सह २३ पदकांची कमाई

मी.धावणे सारा केंद्रे रौप्यपदक, मुले ६०० मी. धावणे नारायण बिंद रौप्यपदक, मुले सांघिक ४*१०० रिले रौप्यपदक, १७ वर्ष मुली गोळाफेक, थाळीफेक व १५०० मी.धावणे आकांक्षा जाधव सुवर्णपदक, ३००० मी.धावणे तन्वी सुवर्णपदक, ३००० मी. चालणे रिया औटी सुवर्णपदक, कांशिका ठाकूर रौप्यपदक. मुले थाळीफेक जीत म्हात्रे सुवर्णपदक, ५००० मी. चालणे तिकोने सोहम सुवर्णपदक, सौरभ वावळे द्वितीय क्रमांक, ३००० मी.धावणे व १५०० मी.धावणे अमित डांगर रौप्यपदक, गोळाफेक व २०० मी.धावणे जीत म्हात्रे कांस्यपदक, ३००० मी.धावणे प्रमोदकुमार महतो कांस्यपदक, अनिल चौहान भालाफेक कांस्यपदक, १९ वर्ष मुली ३००० मी. चालणे आर्या ढगे सुवर्णपदक, आस्मी म्हात्रे रौप्यपदक, मुले ४०० मी. धावणे सागर साऊद कांस्यपदक, ५००० मी. चालणे सादिक शेख प्रथम क्रमांक.

पुढील विद्यार्थ्यांची थेट जिल्हास्तर निवड झाली

१४ वर्षे मुले अंश जाधव ८० मी. हार्डल्स, १७ वर्षे मुले संस्कार राठोड १०० मी व ४०० मी. हार्डल्स, १७ वर्षे मुले पीयूष कडू हॅमर थ्रो, १९ वर्ष मुले अजय चव्हाण हॅमर थ्रो, १९ वर्ष मुले सागर साऊद -क्रॉस कंट्री.

# रेवदंडा येथे साखळी कबड्डी स्पर्धा रंगली

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मच्छीमार बांधव, सागर सुरक्षा दल आणि पोलीस यांच्यामध्ये समन्वय वृद्धींगत करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस दल अंतर्गत सागरी सुरक्षा चषक २०२५ची साखळी कबड्डी स्पर्धा रेवदंडा बीचवर मोठ्या उत्साहात झाली.

या स्पर्धेस कोकण परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, ग्रामपंचायत सदस्य राजन वाडकर आदींची प्रमुख उपस्थिती लाभली.



स्पर्धेत रेवदंडा विरुद्ध पोयनाड, नागोठणे विरुद्ध अलिबाग आणि पोयनाड विरुद्ध नागोठणे असे सामने खेळविण्यात आले. यातील पोयनाड व नागोठणे संघांनी बाद फेरीत प्रवेश मिळविला आहे.

पंच म्हणून सहाय्यक फौजदार नितीन समजिसकर, नंदकुमार पाटील, संजय मोकल, हवालदार अमोल नलावडे, स्वागत ठाकूर, नाईक प्रणित पाटील, शिपाई सुरज म्हात्रे, सर्वेश थळे, ज्ञानेश्वर पालवे यांनी काम पाहिले. रायगड जिल्हा स्पोर्ट्स इन्चार्ज ऋषिकेश साखरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, मारूती पाटील, चंद्रकांत बोरकर यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचलन संजय पोईलकर यांनी केले.

या वेळी उपस्थिताना मार्गदर्शन करताना पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी कबड्डी हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो, शालेय जीवनात कबड्डीसाठी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर निवड होते. फिटनेस व सांघिक भावनेच्या दृष्टीने हा खेळ फार महत्त्वाचा आहे, असे सांगतानाच आयजी कोकण माध्यमातून समुद्र संदेश हा चॅनेल सुरू करण्यात आला असून तो स्कॅन करून घ्यावा. याद्वारे सागरी सुरक्षाविषयक मेसेज मिळतील व हे मेसेज परिसरात नागरिकांपर्यंत पोहचवायचे आहेत, जेणेकरून समुद्र किनारा सुरक्षित ठेवता येईल, असे सांगितले.

स्पर्धेसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले, हेडकॉन्स्टेबल महेंद्र राठोड, मनीष ठाकूर, नाईक सुग्रीस गव्हाणे, सिद्धेश शिंदे यांच्यासह रेवदंडा पोलीस ठाणे कर्मचारीवर्ग व रेवदंडा सागरी सुरक्षा दल सदस्य तसेच रेवदंडा सागरी दल प्रमुख सुहास घोणे व अन्य सदस्य, पोलीस पाटील स्वप्नील तांबडकर, ग्रामपंचायत कर्मचारी सचिन मयेकर यांनी परिश्रम घेतले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com